अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि.२१ एप्रिल २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २०२ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## राज्यातील सर्व शाळांना आजपासून सुट्ट्या जाहीर

**मुंबई** : वाढत्या उष्णतेच्या लाटांच्या पार्श्वभूमीवर शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. वाढत्या उष्णतेमुळे मे महिन्याच्या सुट्ट्या आता एप्रिलमध्येच देण्याचा राज्य सरकारने निर्णय घेतला. वाढत्या तापमानामुळे राज्यातील राज्य मंडळाच्या सर्व शाळांना २१ एप्रिल म्हणजे उद्यापासून सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाकडून तसा शासन निर्णय जारी करण्यात आलाय. राज्यातील इतर मंडळाच्या शाळा वेळापत्रकानुसार सुरू असल्यास अथवा अशा शाळांमध्ये महत्त्वाचे शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत असल्यास विद्यार्थ्यांना सुट्टी जाहीर करण्याबाबत शाळा प्रशासनाने त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा असे आदेश देण्यात आले आहेत.

### आयपीएल सामना क्र.२८

Vs

चेन्नई सुपरकिंग्ज वि.सनरायझर्स हैद्राबाद

वेळ : सायं.७.३० वा.

स्थळ : चिदंबरम स्टेडियम, चेन्नई

# एका कुटुंबास एकावेळी ६०० रुपये दराने १२ ब्रास वाळू मिळणार

## नवीन वाळू धोरण | शासनाच्या घरकुलांसाठी वाळू मोफत

सुराज्य/सोलापूर

**वाळू चोरांना आळा घालण्यासाठी आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी ६०० रुपयात वाळू देण्याचा शासन निर्णय जाहीर झाला आहे. एका कुटुंबास एकावेळी ५० मेट्रिक टन म्हणजे जवळपास १२ ब्रास वाळू मिळणार आहे. यापेक्षा जादा वाळू लागल्यास एका महिन्यानंतर मागणी केल्यास पुन्हा वाळू दिली जाणार आहे. शासनाच्या घरकुल योजनांसाठी वाळू मोफत मिळणार आहे.**



नदीपात्रातून उपसा केलेल्या वाळूचा सरकारी जमिनीवर साठा करून त्यावर वाळू डेपो उभे केले जाणार आहेत. ज्याठिकाणी सरकारी जमीन उपलब्ध नाही, तेथे खासगी मालकीच्या जमिनी वार्षिक एकरी ३० हजार रुपये भाड्याने घेऊन त्यावर वाळू डेपो तयार केले जाणार आहेत.

नदीपात्रातील वाळूचा उपसा करण्यासाठी वाळू गटाचे स्थळ निरीक्षण व निश्चितीसाठी तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक उपसमिती करण्यात येणार आहे. ही तांत्रिक उपसमिती प्रांताधिकारी अध्यक्ष असलेल्या वाळू सनियंत्रण समितीला वाळू उपशाबाबत अनुकूल अहवाल दिल्यानंतर ही समिती पुन्हा आपला अहवाल जिल्हाधिकारी अध्यक्ष असलेल्या जिल्हास्तरीय वाळू सनियंत्रण समितीला देईल. त्यानंतर जिल्हास्तरीय समिती वाळू डेपोमध्ये वाळूसाठा उपलब्ध करून देण्यासाठी वाळू गट निश्चित करतील. वाळू गटातून वाळू उपसा करून ती वाळू डेपोपर्यंत वाहतूक, डेपो निर्मिती व वाळू डेपोचे व्यवस्थापन करण्यास निविदा काढण्यात येणार आहे. जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी किंवा अपर जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुल बांधणाऱ्या तसेच दारिद्र्यरेषेतील लाभार्थ्यांना घरकुलासाठी मोफत वाळू देण्याचा निर्णय नवीन वाळू धोरणात घेण्यात आला आहे. यासाठी गटविकास अधिकाऱ्यांनी सादर केलेली यादी तहसीलदारांनी तपासून दिल्यानंतर गरीब घरकुल लाभार्थ्यांना विनामूल्य वाळू उपलब्ध करून देण्यात येणार आहे. वाहतुकीचा खर्च मात्र लाभार्थ्यांना करावा लागणार आहे. निविदाधारकाने वाळूचा उपसा करून ती डेपोत साठा करून तेथून विक्री करावयाची आहे. निविदाधारकाबरोबर शासन करार करणार आहे.

करारानंतरच वाळू स्थळाचा ताबा देण्यात येणार आहे. निविदेचा कालावधी तीन वर्षांचा असणार आहे. १० जून ते ३० सप्टेंबर या पावसाळा कालावधीत वाळूचा उपसा करता येणार नाही.

### वाळू डेपोवर संगणकीकृत यंत्रणा

वाळू डेपोला काटेरी तारेचे कुंपण घालावे लागणार आहे. वाळू डेपो व वजन काट्याच्या ठिकाणी २४ तास सीसीटीव्ही कॅमेरे लावावे लागणार आहेत. विजेची सोय करावी लागणार आहे. तसेच वीज पुरवठा बंद पडला तर जनरेटरची सुविधाही ठेकेदाराला करावी लागणार आहे. वाळू डेपोमधून वाळूच्या विक्रीकरिता साठा रजिष्टर, आवक व जावक रजिष्टर या सर्वांसाठी संगणकीकृत व्यवस्था उभारावी लागणार आहे.

### वाळू खरेदीसाठी नोंदणी

ज्यांना वाळू खरेदी करायची आहे त्यांनी महा खनिज या प्रणालीवर वाळू खरेदीची मागणी नोंदवावी लागणार आहे. ज्यांना हे शक्य नाही त्यांनी सेतू केंद्रामार्फत ही मागणी नोंदवू शकतील. वाळूची मागणी केल्यानंतर पंधरा दिवसाच्या आत वाळू घेऊन जाणे बंधनकारक आहे. काही अपरिहार्य कारणास्तव विलंब झाला तर तहसीलदारांकडे मुदतवाढ मागता येते. प्रायोगिक तत्त्वावर एक वर्षासाठी सहाशे रुपये दराने प्रतिब्रास वाळू उपलब्ध होणार आहे. वाहतुकीचा खर्च मात्र खरेदीदारांना करावा लागणार आहे.

### वाळू वाहतूक गाड्यांना जीपीएस प्रणाली

नदीपात्रातील वाळू गटातून वाळू डेपोपर्यंत वाळूची वाहतूक ही ट्रॅक्टर किंवा सहा टायरच्या टिप्पर वाहनाद्वारेच करता येणार आहे. हायवा किंवा डंपर यासारख्या जड वाहनांना परवानगी असणार नाही. वाहतूक करणाऱ्या वाहनांना जीपीएस यंत्रणा बसविणे बंधनकारक आहे. वाळू वाहतूक करणाऱ्यांना वाहनांचा दर्शनी भाग हा पिवळ्या रंगाचा करावा लागणार आहे. या वाहनाद्वारे वाळू डेपो वगळता इतरत्र वाहतूक केल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.

## सराईत गुन्हेगार बलरामवाले स्थानबद्ध

सुराज्य/सोलापूर

शहरातील विजापूर नाका, फौजदार चावडी, जोडभावी पेठ आणि सदर बझार पोलिस ठाणे या चार पोलिस ठाणे हद्दीत १७ गुन्हे दाखल असलेला सराईत गुन्हेगार आकाश तुळजाराम बलरामवाले (वय-२५, रा. जुना विजापूर नाका, झोपडपट्टी १, विजापूर रोड) याला एमपीडीए अधिनियमानुसार स्थानबद्ध करण्यात आले आहे.

आकाश बलरामवाले हा मागील अनेक वर्षांपासून अवैध आर्थिक फायदा मिळवण्यासाठी, बॉम्बे पार्क, आरटीओ ऑफिसजवळ, विजापूररोड, आसरा सोसायटी, मोदी खाना, बाळीवेस, बुधवार पेठ, कसबा चौक, कुंभार वेस, नवीपेठ, विजापूर नाका झोपडपट्टी १, जुळे सोलापूर परिसरात व्यापारी व सामान्य नागरिक यांना दहशत व भीती घालून गंभीर स्वरूपाचे गुन्हे करीत आला आहे. त्याच्यावर शहरातील चार पोलिस ठाण्यात एकूण १७ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.

## ▪ नगर अभियंता कार्यालयात मक्तेदारांमध्ये वादावादी; महापालिका आवेक्षकांना दिली बघून घेण्याची धमकी

**सोलापूर** : महापालिकेच्या नगर अभियंता कार्यालयात गुरूवारी दुपारी मक्तेदारांमध्ये चांगलीच वादावादी झाली. याच दरम्यान मक्तेदारांनी महापालिकेचे आवेक्षक श्रीरंग नादरगे यांना बघून घेण्याची भाषा करत धमकीच दिली. यामुळे चांगलाच गोंधळ उडाल्याचे दिसून आले.

सोलापूर महारपालिका नगर अभियंता कार्यालय रस्ते विभागाच्या वतीने नगरोत्थान योजनेतील १३० कामांपैकी १५ लाखांच्या आतील अंदाजे साडेतीन ते चार कोटींच्या ४४ कामांची टेंडर प्रक्रिया राबवण्यात येत आहे. या टेंडर प्रक्रियेत शहरातील जवळपास ८० मक्तेदारांनी सहभाग नोंदवून कागदपत्रे दाखल केली आहेत. नगर अभियंता रस्ते विभाग कार्यालयातील आवेक्षक श्रीरंग नागरगी यांनी मक्तेदारांनी दाखल केलेल्या कागदपत्रांची छाननी केली. यात अनेक मक्तेदारांनी अपुरी कागदपत्र दाखल केल्याचे आढळले. त्यामुळे नादरगी यांनी सर्व मक्तेदारांना पत्र पाठवून कागदपत्रांची पूर्तता करण्याचे कळवले होते. त्यासाठी बुधवारची वेळ दिली होती. मात्र काही मक्तेदार परगावी असल्यामुळे त्यांना कागदपत्रे दाखल करता आली नाहीत. परिणामी त्यांना एक दिवसाची मुदतवाढ देण्यात आली होती.

त्यामुळे गुरुवारी कागदपत्रे दाखल करण्याची अंतिम मुदत होती. त्यामुळे मक्तेदारांनी नगर अभियंता रस्ते विभाग कार्यालयात गर्दी केली होती. यावेळी काम घेण्याच्या कारणावरून दोन कन्स्ट्रक्शनच्या मक्तेदारात यांच्यात कार्यालयातच वाद झाला. या वादातून मक्तेदारांनी महापालिकेचे आवेक्षक श्रीरंग नादरगी यांनाच बघून घेण्याची धमी दिली. त्यामुळे नादरगी कार्यालय सोडून निघून गेले. कार्यालयातील मक्तेदारांचा गोंधळ पाहून कार्यालयातील अधिकारी कर्मचारी गोंधळून गेले. यावेळी उपअभियंता तपन डंके यांनी मध्यस्थी करून मक्तेदारांना शांत करण्याचा प्रयत्न केला मात्र मक्तेदार ऐकण्याच्या पलीकडे गेले होते. त्यामुळे डंकेही आपल्या कार्यालयातून निघून गेले. पालिका आयुक्तांनी याची गंभीर दखल घेऊन संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.





## वाढत्या उन्हाची सोलापूरकरांना झळ; घामेघूम तरूणाची सिग्नलवर आंघोळ

सुराज्य/सोलापूर

मागील काही दिवसांपासून सोलापूरच्या तापमानात सातत्याने वाढ होत आहे. वाढत्या उन्हामुळे उकाडाही वाढला असून सोलापूरकर घामाघूम झाले आहेत. तापमानाचा पारा ४२ अंशाच्या पुढे गेला आहे. उन्हाचा पाऱ्यामुळे सोलापूरकर पुरते हैराण झाले आहेत. शहरातील सरस्वती चौकात चक्क सिग्नलवर थांबलेला दुचाकीस्वार उन्हामुळे चक्क आंघोळ करतानाचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे.

शहरातील सरस्वती चौकात सिग्नल आहे. या सिग्नलवर गाड्या थांबलेल्या आहेत. यात एक दुचाकीस्वार आपल्या मित्रासोबत आहे. गाडीवर पाठीमागे बसलेल्या मित्राने बादली अन् मग आणलेला आहे. शेकडो गाड्या सिग्नलवर थांबलेल्या असताना अचानक दुचाकीवरील एकानं बादलीतील पाणी अंगावर ओतून घेण्यास सुरुवात केली. स्वत:बरोबरच गाडी चालवीत बसलेल्या मित्राच्याही अंगावर पाणी ओतत असतानाचा हा व्हिडिओ आहे. हा व्हिडिओ सोशल मिडियावर खूप व्हायरल होत आहेत. आतापर्यंत लाखो लाईक्स व शेकडो लोकांनी या व्हिडिओला शेअर केले आहे.

## मसाला पानात गुंगीचे औषध देऊन तरुणीवर अत्याचार

**सोलापूर** : लग्नाचे आमिष दाखवून मसाला पानात गुंगीचे औषध देऊन तरुणीवर अत्याचार केल्याप्रकरणी तरुणाविरुद्ध सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, संशयित आरोपी शुभम गौतम शिंगे (रा.सोलापूर) याने पीडित तरुणीला जुलै २०२२ दरम्यान लग्नाचे आमिष दाखवून त्याच्या राहत्या घरी नेऊन मसाला पानामध्ये गुंगीचे औषध देऊन शारीरिक संबंध ठेवून अत्याचार केला. तसेच जुलै २०२२ ते सप्टेंबर २०२२ दरम्यान तरुणीचे नग्नावस्थेतील फोटो व व्हिडिओ दाखवून ते व्हायरल करण्याची धमकी देऊन पुन्हा तिच्यावर अत्याचार केला. दि.१५ ते १८ एप्रिलपर्यंत सर्व फोटो व व्हिडिओ फिर्यादीच्या नातेवाईकांना व्हाटस्ॲपद्वारे प्रसारित करतो म्हणून २ लाखांची मागणी करून बदनामी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी पीडित तरुणीने सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, फिर्यादीवरून शिंगे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## स्नॅपचॅटवर ओळख झालेल्या तरुणीला नेले कर्नाटकात

सुराज्य/सोलापूर

स्नॅपचॅटवर ओळख झालेल्या तरुणीची इच्छा नसताना लग्नाचे आमिष दाखवून जबरदस्तीने तिला सोलापुरातून कर्नाटक येथे वेगवेगळ्या ठिकाणी नेले.त्यानंतर तुला तरी मारतो नाहीतर मी तरी मरतो, याला जबाबदार तू असणार आहेस, अशी धमकी दिल्याची घटना उघडकीस आली आहे.



याप्रकरणी जैन सादिक जहागीरदार (वय-२२,रा. सोलापूर) याच्याविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,स्नॅपचॅटवरून ओळख झालेल्या तरुणीचा साखरपुडा दुसऱ्या एका तरुणासोबत सहा महिन्यापूर्वी झालेला असताना जैन जहागीरदार याने पीडित तरुणीशी बोलत असताना जैन याने तुझा साखरपुडा झालेला मुलगा चांगला नाही, त्याचे दुसऱ्या मुलीसोबत प्रेमप्रकरण आहे.त्याबाबतचे पुरावे माझ्याकडे आहेत. ते मी तुला भेटून दाखवतो, असे म्हणत पीडित तरुणीला बोलवून कारमध्ये नेऊन कर्नाटक येथे विविध ठिकाणी ठेवून बंदुकीचा धाक दाखवला.त्यानंतर पीडित तरुणीला तू येथून गेली तर मी तुला तरी मारतो, नाहीतर मी तरी मरतो, याला जबाबदार तू आहेस, असे म्हणून धमकी दिली, असे फिर्यादीत नमूद आहे.या घटनेची नोंद एमआयडीसी पोलीस ठाण्यात झाली असून,या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



लोकसंख्येत आपण चीनला ही मागे टाकले आहे !

| कल्याण |
|---|
| 589-27-368 |

| मेन बाजार |
|---|
| -------- |

# संवेदनशील अधिकारी पाहून शांताबाई काळे झाल्या भावूक

## ▪ अप्पर जिल्हाधिकारी ठोंबरे यांनी नवीन घरी येण्याचा दिला शब्द

सुराज्य/सोलापूर

आई, यापुढेही काय मदत लागली तर नक्की सांगा, अशी भावनिक साद अपर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी शांताबाई काळे यांना घालताच त्या माउलीच्या चेहऱ्यावर आनंदाची लकेर पाहायला मिळाली. ठोंबरे यांचे बोल ऐकून शांताबाई काळे इतक्या भावुक झाल्या की, साहेब पुढच्या वेळेस येताना मी काहीतरी तुमच्यासाठी गोड आणेन, असे म्हणताच ठोंबरे यांनी काही गोड आणू नका, तुमच्या घराचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर आम्हीच तुमच्याकडे भेट द्यायला येऊ, असे म्हणाले.

कोल्हाट्याचं पोर' या आत्मचरित्रामुळे किशोर शांताबाई काळे हे नाव संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहे. शांताबाईंनी अतिशय कष्टातून मुलगा किशोर याला शिकवले, मोठे डॉक्टर केले, ही सर्व कहाणी कोल्हाट्याचे पोर' सांगून जाते. परंतु किशोर काळे यांचे दुर्दैवाने अपघाती निधन झाले आणि त्यांच्या आई शांताबाई काळे या उघड्यावर आल्या. गेल्या काही दिवसापूर्वी कुणी घर देता का घर' म्हणत त्या सरकारी उंबरठे झिजवत असताना पाहायला मिळाल्या. याचे वृत्त माध्यमात झळकताच प्रशासनाने त्यांची दखल घेतली.

दरम्यान, शांताबाई काळे या बुधवारी अपर जिल्हाधिकारी ठोंबरे यांच्या कार्यालयात आल्या. ठोंबरे यांनी त्यांना आत बोलावून घेतले. तेव्हा शांताबाई यांनी माझ्या घराचे काय झाले साहेब? असा प्रश्न केला.



ठोंबरे यांनी तातडीने हा विषय सामाजिक न्याय विभागाकडे असल्याने समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त नागेश चौगुले यांना भ्रमणध्वनी केला. चौगुले यांनी त्यांचा निधी पंचायत समितीकडे वर्ग केल्याचे सांगितले. त्यानंतर लागलीच ठोंबरे यांनी पुढील भ्रमणध्वनी करमाळ्याच्या गटविकास अधिकाऱ्यांना केला. सविस्तर माहिती घेतली असता शांताबाई काळे यांच्या घरासाठी निधी आलेला आहे. त्यांनी घरकुल बांधायला सुरू केले की- निधी त्यांच्या बँक खात्यात वर्ग केला जाईल, अशी माहिती करमाळ्याच्या गटविकास अधिकाऱ्यांनी ठोंबरे यांना दिली. भ्रमणध्वनीवरील बोलणे संपताच ठोंबरे यांनी शांताबाई काळे यांना तुम्ही घराचे बांधकाम सुरू करा, निधी तुम्हाला मिळून जाईल. आई, आणखी काय मदत लागली तर नक्की सांगा, असे म्हणताच ती माउली भारावून गेली. त्या इतक्या भावुक झाल्या की, साहेब पुढच्या वेळेस येताना मी काहीतरी तुमच्यासाठी गोड आणीन. तेव्हा ठोंबरे यांनी काही गोड आणू नका, अगोदर तुमचे घर बांधा. त्यानंतर आम्ही नक्की घरी भेट द्यायला येऊ, असे सांगितले. माझा आशीर्वाद तुम्हाला लागेल साहेब, असे म्हणून शांताबाई काळे आनंदाने निघून गेल्या.

# लोकसंख्या वाढली, पण...


भारताने लोकसंख्येत शेजारच्या बलाढ्य असणाऱ्या चीन देशाला यात मागे टाकल्याचे वृत्त जगभर गाजले. भारताने लोकसंख्येमध्ये चीनला मागे टाकल्याचे संयुक्त राष्ट्रसंघ सांगते. राष्ट्रसंघाच्या आकडेवारींनुसार भारताची लोकसंख्या १४२.८६ कोटी झाली असून चीनची लोकसंख्या १४२.५७ कोटी आहे. विशेष म्हणजे भारताच्या लोकसंख्येत पुढली तीन दशके वाढ कायम राहणार असून त्यानंतर घट सुरू होईल, असा संयुक्त राष्ट्रसंघाचा अनुमान आहे. 'युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फंड' (यूएनएफपीए) या संस्थेने 'स्टेट ऑफ वर्ल्ड पॉप्युलेशन रिपोर्ट २०२३' हा अहवाल प्रसिद्ध केला असून त्यामध्ये भारताची लोकसंख्या चीनपेक्षाही अधिक झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या अहवालानुसार भारतामध्ये १५ ते ६४ या कमावित्या वर्षांमधील नागरिकांचे प्रमाण लोकसंख्येच्या ६८ टक्के आहे. शून्य ते १४ या वयोगटात २५ टक्के, १० ते १९ वयोगटात १८ टक्के, १० ते २४ वयोगटात २६ टक्के नागरिक आहेत. ६५ वर्षांवरील निवृत्तीच्या वयातील नागरिकांचे प्रमाण अवघे सात टक्के आहे. देशात केरळ आणि पंजाब या राज्यांमध्ये वृद्धांची संख्या सर्वाधिक असून बिहार आणि उत्तर प्रदेश ही राज्ये तुलनेने 'तरुण' असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. १९५० पासून जागतिक लोकसंख्येची आकडेवारी संयुक्त राष्ट्रांमार्फत जाहीर होऊ लागली. त्यानंतर प्रथमच या यादीत भारत अव्वल स्थानी पोहोचला आहे. 'यूएनएफपीए'च्या अंदाजानुसार २०५० सालापर्यंत भारताची लोकसंख्या १६६.८ कोटींपर्यंत गेली असेल तर त्यावेळी चीनची लोकसंख्या १३१.७ कोटींपर्यंत आक्रसण्याची शक्यता आहे. २०३० सालापर्यंत भारतातील वृद्धांची लोकसंख्या आत्ताच्या बरोबर दुप्पट, १९.२ कोटी होईल असा अंदाजही व्यक्त करण्यात आला आहे. २०५० सालापर्यंत दर पाच व्यक्तींपैकी एक भारतीय वृद्ध असेल. हे लक्षात घेऊन ज्येष्ठ नागरिकांची आर्थिक सुरक्षा आणि आरोग्य यासाठी आगामी



काळात नियोजन करावे लागेल, असा इशाराही या अहवालात देण्यात आला आहे. 'यूएनएफपीए'च्या भारतातील प्रतिनिधी अँड्री वोजनर यांनी भारताच्या लोकसंख्येत असलेले तरुणांचे प्रमाण महत्त्वाचे असल्याचे म्हटले आहे. १५ ते २४ वयोगटात २५.४ कोटी भारतीय असून ते सर्जनशीलता, नवे विचार आणि स्थिर परिणामांचे उगमस्थान आहेत. देशातील महिला आणि मुलींना समान शिक्षण आणि संधी मिळणे आणि प्रजननाच्या निर्णयाचे स्वातंत्र्यही महिलांना असणे हे भारताच्या आगामी वाटचालीसाठी अत्यंत महत्त्वाची बाब असल्याचेही वोजनर यांनी स्पष्ट केले.लोकसंख्येमध्ये भारताच्या मागे पडल्याच्या घटनेला चीनने फारसे महत्त्व दिलेले नाही. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ता वांग वेनबिन म्हणाले, की लोकसंख्येपेक्षा तिचा दर्जा अधिक महत्त्वाचा आहे. चीनमध्ये आजही ९० कोटी कमावते हात आहेत आणि देशाच्या विकासाला त्यांचा मोठा हातभार लागत असल्याचेही वेनबिन यांनी म्हटले आहे. सर्वाधिक लोकसंख्येचा रेकॉर्ड अखेर भारताने नावे केलाच. चीनला याबाबतीत तरी भारताने पिछाडीवर टाकले. काहींना ही बाब संकट वाटत असेल पण तज्ज्ञांच्या मते, या संकटातच एक संधी दडलेली आहे.वाढती लोकसंख्या सर्वच स्रोतांवर, संसाधनांवर, सोयी-सुविधांवर प्रभाव टाकते. त्यामुळे खर्चाचे बजेट कोलमडते, हा सार्वत्रिक अनुभव आहे. पण या संकटातच एक संधी दडलेली आहे. तज्ज्ञांच्या मते, लोकसंख्या वाढीचा बाऊ करण्याची गरज नाही. लोकसंख्या नियंत्रणात ठेवण्याचे प्रयत्न करतानाच, हीच लोकसंख्या आपली शक्ती ठरू शकते,असे तज्ञांचे मत पडले आहे. वाढती लोकसंख्येमुळे अनेक गोष्टींवर ताण येतो. एवढ्या मोठ्या लोकसंख्यांचे नियंत्रण, व्यवस्थापन, त्यांचे शिक्षण, पोट भरण्यासाठी हाताला काम मिळण्याची संधी, सरकारी यंत्रणेवर येणारा प्रचंड ताण व इतर खर्चाचे वाढते प्रमाण यासह अनेक संकट आहेत. चीनच्या प्रतिनिधीने याविषयी मात्र बोलकी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांच्या मते, लोकसंख्या वृद्धीच्या आकडेवारी जाऊ नका, पण त्याच्या गुणात्मक फायद्यावर लक्ष केंद्रित करा. आज चीनकडे ९० कोटी कार्यक्षम, प्रशिक्षित, वेलस्कील्ड लोकसंख्या आहे. चीनच्या गतिमान विकासाचे गुपित याच्यातच तर दडलं आहे.याचा विचार भारताला करावा लागणार आहे. लोकसंख्या वाढली ही भूषणावह बाब नाही. देशात रोजगार वाढला पाहिजे. तरुणांना नोकऱ्या मिळायला हव्यात. उद्योग वाढले पाहिजेत. घरात खाणारी माणसे पंधरा आणि कमावणारे पाचजण असतील तर ते घर चालत नाही. तशी आपल्या देशाची स्थिती आहे. कष्ट करण्याची प्रवृत्ती संपत चालली आहे, हीच आपल्या देशाची खरी चिंता आहे.

## सामाजिक

# स्त्री म्हणून जगू द्या...



उलट ती विधवा आहे हे तिचा रिकामा गळा आणि मोकळं कपाळ जितके कोकलून सांगू शकणार नाही तितकं तिच्या नावापुढची गं. भा. ही विशेषण दुनियेला बोंबलून ही बघा विधवा बाई, नवरा नसलेली, समाजात एकटी पडलेली असं सांगायचं काम करतील, यात शंका नाही. म्हणूनच विधवा, सिंगल, परित्यक्त्या महिलांना अशा विशेषनामांची आताशा काही तशी गरज उरलेली नाहीये. आपण एकाकी पडलोय अशा असहायतेच्या कुबड्या घेऊन दुसऱ्याच्या जीवांवर जगणारी किंवा जगू पाहणारी आजची स्त्री नाहीये. उलट आजची स्त्री ही खंबीर आहे. सत्य स्वीकारून पुढे जाण्याची तिच्यात हिंमत आहे. पतीची साथ संपणे, त्यानं सोडून देणं म्हणजे आयुष्य संपणे नाही, तर काहीसा पॉझ घेऊन, पतीवियोगाचे दुःख पचवून पुन्हा नव्याने मुलांच्या कुटुंबाच्या जबाबदाऱ्या स्वीकारून ती पुढे जगू पाहत आहे. आजची स्त्री खंबीर आहे. तिला उगाच गं. भा. वगैरे विशेषण लावून स्पेशल ट्रीटमेंट देण्याचा खटाटोप करण्याची खरं तर काही एक गरज नाहीये. जर सरकारला खरंच या महिलांसाठी काही करायचे असेल तर ते त्याचं सक्षमीकरणं करावं.

**विधवा महिलांचा उल्लेख गंगा भागीरथी, असा करण्यात यावा, असा प्रस्ताव महिला व बालविकासमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी केला आहे. यामागे राज्यातील महिलांना सन्मान मिळवून देण्याचा स्वच्छ हेतू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केलं आहे, पण या प्रस्तावाला महिला संघटनांकडूनच कडाडून विरोध होत आहे. विधवाच नाही तर सौभाग्यवती आणि कुमारिकांचाही यावर समाजाला एकच प्रश्न आहे. विधवा महिलांच्या नावापुढे गं. भा. लावून काय होणार आहे? त्याने काय फरक पडणार आहे? आपला समाज बदलणार आहे का? गं. भा. लावल्याने सरकारी योजनांचा लाभ मिळणार आहे का? नाही ना? मग कशाला या नसत्या उठाठेवी? असाच सूर समस्त महिला वर्गाने लावला आहे. महिलांच्या या संतापामागच्या भावना पाहता खरंच नावापुढे गं. भा. लावल्याने त्या विधवेच्या आयुष्यात काही फरक पडेल, असे दृश्य सध्या समाजात दूरदूरपर्यंत तरी दिसत नाही.**

वर्षभरापूर्वीच कोल्हापूर जिल्ह्यातील हेरवाड ग्रामपंचायतीने विधवा प्रथेवरच बंदी घालण्याचा क्रांतीकारी निर्णय घेतला. त्यानंतर हेरवॉर्ड पॅटर्न राज्यभर राबवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. नंतर विधवा महिलाही सामान्य महिलांप्रमाणे कपाळावर कुंकू, गळ्यात मंगळसूत्र घालू शकतात. यावर समाजाकडूनही शिक्कामोर्तब करण्यात आले. गावात विधवा महिलांचा मान सन्मान केला जाऊ लागला. त्यानंतर कोल्हापूरमधील देवाळे येथे तर विधवा महिलांनी वटपौर्णिमाही साजरी केली. प्रामुख्याने पतीच्या दीर्घायुष्यासाठी पत्नी वडाची पूजा करते, पण विधवा महिलांनी मात्र सौभाग्याचे लेन परिधान करून वडाची साग्रसंगीत पूजा केली.

याचेही राज्यभरातच नाही तर देशभरात कौतुक केले गेले. खरंतरं या चळवळीमागचा हेतूही तसा उदात्तच आहे. कारण आपल्या समाजात आजही विधवा महिलांकडे बघण्याचा दृष्टिकोन फारसा बदलेला नाही. विधवा महिलांना कार्यक्रमांना बोलावणे अशुभ मानले जाते, पण जसा काळ बदलला. तशी समाजाची मानसिकताही बदलत आहे, पण जे शहरात राहणाऱ्यांना जमले नाही ते कोल्हापूरमधील शिरोळ तालुक्यातील हेरवाड गावाला जमले. हेच विशेष आहे. छत्रपती शाहू महाराज जयंतीच्या पार्श्वभूमीवर ग्रामसभेमध्ये 'विधवा प्रथा बंदी'चा ठराव मांडण्यात आला, त्यावर गावाने एकमुखाने मंजुरी दिली.

नंतर अनेक गावांमध्ये, शहरांमध्ये विधवा महिलांचे हळदीकुंकू समारंभही पार पडले. त्याकडे सरकारचे लक्ष वेधले आणि राज्य सरकारनेही विधवा प्रथेवर बंदी आणली. खरं तर हा निर्णय फार मोठा आहे. जो समाज एकेकाळी पती निधनानंतर महिलेच जगणं निरर्थक समजत होता, तिच्यावर सती जाण्याची सक्ती करत होता, तिचे केशवपन करून तिला घरात डांबून ठेवत होता. तोच समाज आज तिला पुन्हा नव्याने जगण्याची उमेद देत असेल तर हे नक्कीच स्वागतार्ह आहे. मग हे सगळं सुरूळीत सुरू असताना गं. भा. ची गरज काय? कोणता उद्देश डोळ्यासमोर ठेवून हा प्रस्ताव मांडण्यात आला? हे पण विचार करण्यासारखे आहे. यामागचा हेतू स्वच्छ महिलांना सन्मान देण्याचा आहे, असे जरी असले तरी विधवेच्या नावापुढे ती विधवा असल्याची जशी बिरुदावली लावण्यासाठी सरकारची धडपड आहे, तशी धडपड कधी विधूर पुरुषाच्या नावापुढे सरकार करत असल्याचे कधी ऐकले आणि वाचलेही नाही. त्याबद्दल कोण आणि केव्हा बोलणार?

हे सगळं एकीकडे सुरू असताना विधवा महिला पुन्हा नव्याने जगू पाहत असताना त्यांच्या नावापुढे गं. भा. लावण्याचं कारण काय? म्हणजे एकीकडे तुम्ही विधवा महिलांना सामान्य महिलांप्रमाणे जगण्याचा, राहण्याचा अधिकार देता आणि दुसरीकडे तिच्या नावापुढे ती 'गंगा भागीरथी' आहे हे दाखवण्याचा हट्ट करता. बरं ते करून त्यातून काही मिळणार आहे का? तर काहीच नाही, पण त्या महिलेची मात्र मानसिक कुचंबणा होणार. जोडीदार कायमचा सोडून जाणे खरंतर हे अगाध दुःखच आहे, पण म्हणतात ना 'वक्त हर चीज का मर्ज है', यामुळे माणसं जोडीदार गेल्यानंतरही निसर्गनियमानुसार काळाच्या प्रवाहात स्वतःला झोकून देतात आणि जगतात. गं. भा. ची नाही त्यांना गरज आहे ती त्या सामान्य महिलाच आहेत, त्यांनाही इतर महिलेप्रमाणे जगण्याचा विचार करण्याचे स्वातंत्र्य आहे हे प्रत्यक्षात दाखवून देण्याचे. यामुळे सरकारने विशेषणाचे कागदी घोडे न नाचवता प्रत्यक्षात या महिलांसाठी भरीव कामगिरी करावी, अशी आजच्या महिलांची मागणी आहे.

**- कविता जोशी-लाखे.**

## टुडेज् ब्लॉग

# कल्पवृक्षातले कोकण

अथांग समुद्रकिनारा. या किनाऱ्यावर माड, पोफळीच्या बागासोबत आमराई आणि अशा अनेक फळ पिकविणारा हा कोकणप्रांत निसर्गाकडून उपजत काही बाबतीत कोकणाला वरदान लाभला आहे. अशातलाच एक म्हणजे 'कल्पवृक्ष' म्हणून ज्याचा उल्लेख होतो त्या नारळाच्या झाडांच्या, माडांच्या बागा कोकणात आहेत.

पूर्वी तर कोकणाशिवाय नारळ महाराष्ट्रात कुठेच होत नाहीत, असे आपण म्हणायचो. एक खरं आहे. कोकणातील नारळाला एक वेगळी 'टेस्ट' आहे. कोकणातील शहाळ्याचे पाणीही एक सलाईनचं काम करतं असं म्हणतात. पूर्वी कोकणातील प्रत्येक घरांच्या आजूबाजूला चार-दोन तरी माड उभे असायचे. तेव्हा मात्र एक गोष्टींची चर्चा केली जायची, ती म्हणजे नारळ फक्त कोकणातच धरतात. महाराष्ट्रातील अन्य भागात नारळ होत नाहीत. झाले तरीही नारळ धरत नाहीत असं म्हटलं जायचे; परंतु आता मात्र वस्तुस्थिती फार वेगळी आहे.

कोकणापेक्षाही अधिक नारळ अन्य भागातही धरताना दिसतात. दोन नारळाची झाडं माड घराशेजारी, शेतात असतील तर पाच माणसांचं एक कुटुंब आरामात उदरनिर्वाह करू शकतं, असं म्हटलं जायचे ही वस्तुस्थिती आहे. जसे नारळाचे खोबरे जेवण-खाण्यामध्ये वापरतात तसेच त्याच्या करवंटी, त्याची सोडणं या सगळ्यांचा उपयोग होतो. त्याचे पैसेही येतात. कोकणात एवढ्या मोठ्या प्रमाणावर नारळाची झाडं असतानाही शहाळी मात्र कर्नाटक राज्यातून येतात. याचे कारण कोकणातील नारळ बागायतदार शहाळी काढू देत नाहीत. नारळ बागायतदारांमध्येही कोणतीही व्यावसायिकता दिसत नाही. जेवण-खाण्यापुरते नारळ मिळतात. यातच कोकणातील बागायतदार शेतकरी समाधान मानतो. पाहुणे आले की, हक्काने आपल्या माडावरची शहाळी उतरवून देण्यात तो आनंद मानतो.

अलीकडे कोकणातही शहाळी विक्रीचे स्टॉल दिसू लागले आहेत; परंतु या स्टॉलवर विक्रीला असणारी शहाळी कर्नाटकातून येतात. एक तर नारळ लावतानाही बागायतदार दूरदृष्टीने व्यावसायिक विचार करून नारळ लावत नाही. लवकर पीक येणारे नारळ लावले जातात.

काही नारळ शहाळ्याच्याही योग्य नसतात. त्याचं खोबरही जेवणात वापरता येणारे नसते. मात्र, तरीही कोकणात जी व्यावसायिकता आंबा, काजूमध्ये आहे ती नारळ, सुपारी, कोकममध्ये नाही. त्याचं अर्थशास्त्र कोकणातील शेतकरी कधीच मांडत नाही. त्यातून पैसे अधिक कसे मिळवता येतील यासाठीची अस्वस्थता त्याच्यामध्ये नसते. त्यामुळेच शेतकरी पारंपरिक माड उभे करण्याचा प्रयत्न करतो.

या नारळ बागेमध्येही आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून नवीन काही करता येऊ शकते. आंध्रप्रदेश, केरळ या राज्यांनी नारळाच्या माध्यमातून काथ्या उद्योगात प्रचंड प्रगती केली आहे. केरळमध्ये मोठ्या प्रमाणावर येणाऱ्या पर्यटकांच्या माध्यमातून 'नारळपाणी'चं खास आकर्षण केलं आहे. खरंतर केरळ आणि आपलं कोकण यात अनेक बाबतीत साम्य आहे; परंतु इथल्या निसर्ग संपत्तीचं मार्केटिंग कोकणवासीयांना कधीच जमलं नाही. हे जमण्यासाठी तसा सार्वत्रिक विचार रुजावा लागतो. नारळाचा विषय आला की, कोकणवासीय



अभिमानाने नारळांची महती सांगतात. त्याचं समाधानही आहे; परंतु या नारळ बागायतदार शेतकऱ्याला म्हणावा तसा फायदा मिळत नाही. पुन्हा इथे वन्यप्राणी माकडांचा जो त्रास आहे, त्यामुळे कोकणातील शेतकरी हैराणच आहे. माडांवर दिसणारे नारळ तयार होऊन शेतकऱ्याला मिळतील तो त्याचा आनंदाचा दिवस. याचे कारण कोकणात माकडांचा त्रास फारच वाढला आहे. कोकणातील शेतकऱ्यांनी नारळ बागायतीत अधिक स्वारस्य घेऊन काम करावे असे सांगणेही अवघड झाले आहे; परंतु कोकणातील शेतकऱ्यांनीही शहाळ्यांचे मार्केट काबिज केलं पाहिजे.

**- संतोष वायंगणकर.**

## जन्म हा अखेरचा

# कायानुग्रहस्थल - ३



एकदा यदू नामक राजाने दत्तात्रेयांना विचारले, 'महाराज, आपल्याजवळ जर काहीच नाही, तरी आपण नेहमी प्रसन्न दिसता. माझ्याजवळ सत्ता-संपत्ती सारे काही आहे, परंतु माझ्या मनात दुःखच भरलेले आहे याचे कारण काय?'

दत्तात्रेयांनी त्याला सुरेख उत्तर दिले. ते म्हणाले, 'राजा, तुझा नित्यसंबंध ज्या वस्तूंशी आहे, त्या जड आहेत. जड वस्तू परिवर्तनशील असतात. त्यांच्या ठिकाणी अस्ति, जायते, वर्धते, विपरिणमते, अपक्षीयते, विनश्यति असे सहा विकार असतात. त्या जन्मतात आणि नष्ट होतात. त्यात सुख नाही. दुःखरुपी वस्तूंशी तुझा नित्य संबंध असल्यामुळे तू दुःखी आहेस, माझ्या मनाचा संबंध नित्य परमात्म्याची असतो, परमात्मा, चित्सागर आहे, सुखसागर आहे. त्यामुळे मी सर्वदा आनंदी असतो.'

संसार जड आहे आणि जडात अव्यक्त राहणारा परमात्मा चिद्रुप आहे. जडापासून जो आनंद मनुष्याला मिळतो, तो परमात्म्याच्या आनंदाचा अंश असतो. शिवयोग्याचे चित्त चित्सागर आणि सुखसागर अशा परशिवात विलीन झालेले असते. म्हणून जो जे काही पाहतो ते शिवरुप असते. जशी दृष्टी असते तशी सृष्टी असते. आपली मनोवृत्ती जशी असते, तसा आपल्याला प्रपंच दिसत असतो. हृदयात भगवंत भरून राहिला असेल तर दृष्टी भगवन्मय होते. तुलसीदासांनी म्हटले आहे की, या दुःखमय संसारात पाच रत्ने मौल्यवान आहेत. **तुलसी इस संसार में पांच रतन है सार । साधुमिलन हरिभजन दया धर्म उपकार ।।** दुःखमय संसारात आनंद देणारी पाच रत्ने संतांनी शोधून काढली आहेत. साधुसंग, हरिभजन, दया, धर्म आणि उपकार ही पंचरत्ने होत. ज्ञानी-अज्ञानी सर्व जीवांना संसारात राहावे लागते. संसार म्हणजे सुख-दुःखांचे मिश्रण. या संसारात संतांनी सुखाचा शोध घेतला आहे तर सांसारिकांनी दुःखाचा शोध घेतला आहे. म्हणून सामान्य माणसाच्या अवतीभोवती दुःखच दुःख भरलेले असते. आपल्याजवळ किती दुःखे आहेत हे सांगणे देखील अवघड आहे. एका कन्नड संताने म्हटले आहे की, 'आपण दुःख अंथरतो आणि दुःखच पांघरतो. त्यामुळे आपल्याला शांत झोप कधी लागत नाही. तुलसीदासांनी मात्र संसारातील पाच सुखरत्नांचा शोध घेतला. साधुमिलन म्हणजे संतसहवास. संतांच्या संगतीत सुखाचा लाभ होतो. संत हे सुखानुभवी असतात. म्हणून त्यांच्या सहवासाने सुख लाभते. जीवनात इतर काहीही न मिळता केवळ संतसंग लाभला तरी सारे काही मिळाल्यासारखे होते.' **(क्रमशः) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# अक्षय तृतियेचा सकारात्मक संदेश

वैशाख महिन्यातील शुक्ल पक्षाच्या तृतीयेला (तिसरा चंद्रदिवस) साजरा केला जाणारा अक्षय तृतीया हा हिंदू सणांपैकी एक महत्त्वाचा सण आहे. अक्षय तृतियेला 'अखाजी' असेही म्हणतात.

'अक्षय' म्हणजे ज्याचा कधीही क्षय म्हणजेच नाश होत नाही. या दिवशी केले जाणारे कोणतेही कार्य मनुष्याच्या जीवनात कधीही न समाप्त होणारे फळ देते. म्हणूनच या तिथीला जेवढे पुण्यकार्य व दानधर्म केले जाते, त्याचे शुभ फळ निश्चितच मिळते. अक्षय तृतीया विवाहासाठी शुभ दिवस मानला जातो. ह्या दिवशी विवाह केल्याने विवाहित जोड्याचे बंधन कायम टिकते. अक्षय तृतियेच्या दिवशी भगवान विष्णूंचे अवतार भगवान परशुराम यांचा जन्म झाला होता. याच दिवशी आकाशगंगेत निवास करणारी पवित्र गंगा नदी राजा भगीरथांच्या तपामुळे भगवान शंकरांनी पृथ्वीवर पाठवली होती तर देवी अन्नपूर्णेचा जन्म अक्षय तृतियेच्या शुभ दिवशी झाला होता, असे मानतात. या दिवशी अन्नपूर्णा देवीची पूजा करून गरिबांना दान दिले जाते.

दक्षिण भारतात अक्षय तृतियेच्या दिवशी देवी लक्ष्मीने कुबेराच्या तपाने प्रसन्न होऊन त्यांना धनाचे देवता बनवले होते. म्हणून या दिवशी लक्ष्मी यंत्र आणि भगवान कुबेराची देखील पूजा केली जाते. महाभारतामध्ये देखील अक्षय तृतियेचा उल्लेख सापडतो. महर्षी वेद व्यास यांनी याच शुभ दिवशी महाभारत लिहिण्यास सुरुवात केली तर युधिष्ठिराला अक्षय तृतियेच्या दिवशी अक्षय पात्र 'वरदान' म्हणून मिळाले. वनवासा दरम्यान जोवर द्रौपदीचे भोजन होत नाही, तोवर या अक्षय पात्रातील अन्न संपत नसे.

एका कथेनुसार अक्षय तृतियेच्या दिवशी भगवान कृष्ण आणि सुदामा यांची भेट झाली होती. भविष्यपुराणनुसार अक्षय तृतियेच्या दिवशी सत्युग आणि त्रेतायुगचा आरंभ झाला होता.


अक्षय तृतियेच्या दिवशी लहान-लहान गोष्टी दान करण्याचे मोठे महत्त्व आहे. म्हणून अक्षय तृतीया हा अत्यंत शुभ दिवस असतो. विद्वान पंडित आणि धर्माचे ज्ञान असणाऱ्यांच्या मते या दिवशी शुभ कार्य करण्यासाठी पंचांग पाहण्याची आवश्यकता नाही. साडे तीन मुहूर्तापैकी अक्षय तृतीया हा एक मुहूर्त समजला जातो. तरीही यावर्षी अक्षय तृतियेचा शुभ दिवस २२ एप्रिलला असून पूजेचा मुहूर्त सकाळी ७ वाजून ४९ मिनिटे ते दुपारी १२ वाजून २० मिनिटे असा आहे.

**- प्रा. व्ही. व्ही. कोष्टी, शिपूर सांगली.**

# ...मग गिरीजा टिक्कूचे काय?

**सध्या सर्वत्र चर्चा आहे, ती गुजरात दंगली दरम्यान बिल्कीस बानो या अल्पसंख्यांक मुस्लीम महिलेवर अत्याचार करणाऱ्या आरोपींना भारताच्या अमृत महोत्सवानिमित्त का सोडून देण्यात आले? सुप्रीम कोर्टाने देखील गुजरात सरकारला या संदर्भात कारणे दाखवा नोटीस बजावलेली आहे. मग ११ जून १९९० मध्ये काश्मीरमध्ये गिरीजा टिक्कू नामक हिंदू पंडित महिला एका शाळेमध्ये लॅब असिस्टंट म्हणून काम करत होती आणि आपला पगार आणण्यासाठी ती शाळेत गेली. पगार घेतल्यानंतर ती आपल्या एका मुस्लीम सहकारीला भेटण्यासाठी तिच्या घरी गेली असता तिच्या मार्गावर असलेल्या जिहादी आतंकवाद्यांनी तिचे अपहरण केले. तिच्यावर सामूहिक बलात्कार केला आणि एवढ्याने त्यांचा जिहाद संपला नव्हता म्हणून जिहादींनी तिला आरीच्या मधोमध ठेवून जिवंत कापून तिची हत्या केली आणि त्यातील आरोपी मोदी सरकार सत्तेत येईपर्यंत मोकाट होते? १९९० ते २०१४ म्हणजे जवळजवळ २४ वर्षे हे जिहादी नराधम कोणाच्या आशीर्वादाने मोकाट फिरत होते? या संदर्भात सुप्रीम कोर्ट काश्मीर सरकारकडून अहवाल मागवणार का? त्यावेळेच्या जिहादी काश्मीर सरकारला कारणे दाखवा नोटीस बजावणार का? हा माझा प्रश्न आहे.**

त्यावेळेस केंद्रात काँग्रेसची सत्ता होती. मीडिया होती. न्यायालयेही होती तरीही हे आरोपी २४ वर्षे मोकाट का होते? कोणाच्या आशीर्वादाने होते? या प्रकरणाची चौकशी नको व्हायला? माध्यमावर कोणाचा दबाव होता की त्यांनी डोळेझाक भूमिका घेतली. न्यायालयावर कोणाचा दबाव होता की ज्यामुळे हे आरोपी २४ वर्षे मोकाट होते? पोलिसांवर कोणाचा दबाव होता की ज्यामुळे या आरोपींना ते अटक करू शकले नाहीत. या सर्व प्रकरणाची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. यासीन मलिकसारख्या नराधमाला तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्याशी भेट का घडवून आणण्यात आली? इंडिया टीव्हीमध्ये त्याची मुलाखत का घेण्यात आली? कोणाच्या आशीर्वादाने घेण्यात आली? बिट्टा कराटे कोण होता? त्या नराधमाने कित्येक हिंदू पंडितांची हत्या केलेली आहे. केवळ जन्मठेप ही शिक्षा त्यांना पुरेशी आहे का? त्यांचा गुन्हा माफ करण्यासारखा नाही. भारत सरकारने ही गोष्ट समजून घेतली पाहिजे. इतका अनन्वित अन्याय-अत्याचार हिंसा काश्मीरमध्ये त्यांनी घडवून आणली आहे आणि आज ते तुरुंगामध्ये सरकारचे फुकटचे राशन खात बसलेले आहेत? सरकारच्या बिन भाड्याच्या खोलीत राहत आहेत? त्यांचा गुन्हा इतका गंभीर आहे की त्यांना फाशीची शिक्षा सुद्धा कमी आहे. तो नराधम होता, माहिती होते ना? नराधमाला पंतप्रधानाची भेट घडवून आणण्यात येते, आपल्या देशात? या यासीन मलिक आणि बिट्टा कराटे यांना कोणत्या देशातून आर्थिक रसद मिळत होती? काश्मीरमध्ये यांना राज्य सरकारचा पाठिंबा होता की केंद्र सरकारचा पाठिंबा होता? पोलिसांचा पाठिंबा होता की लोकसेवकांचा पाठिंबा होता? माध्यमाचा पाठिंबा होता की आणखीन काही? या सर्व गोष्टींची चौकशी झाली पाहिजे आणि



त्या आरोपींना भर चौकात फाशी दिली पाहिजे तर आणि तरच गिरीजा टिक्कू नामक महिलेला न्याय मिळेल असे मला वाटते. तिचा गुन्हा काय होता? तिचा गुन्हा हा होता की ती हिंदू होती आणि विशेष म्हणजे ती काश्मीरमध्ये राहत होती आणि तिच्यावरचा अत्याचार आणि तिची हत्या बघून काश्मीरमधील इतर सर्व पंडित महिलांनी आणि पुरुषांनी पळून जावे हा आतंकवाद्यांचा उद्देश होता. सध्याच्या केंद्र सरकारने 'काश्मीर फाईल' चित्रपट पाहिला नाही का? मग का त्या आतंकवाद्यांना तुरुंगात पोसताय तुम्ही? त्यांना भर चौकात उभे करून गोळ्या घाला आणि त्याचे फोटो व्हिडिओ व्हायरल करा मग कोणताही जिहादी आतंकवादी आपल्या देशात जिहाद करण्याचा विचार सुद्धा करणार नाही आणि जर करण्याचा प्रयत्न केला तर त्याचे परिणाम काय होतात हे एकदा भर चौकात गोळ्या घालून सरकारने दाखवून द्यावे. कायद्याची जरब असली पाहिजे. कायद्यात पळवाटा नको आहेत. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांना एका मुलाखतीत विचारण्यात आलं होतं की भारताचे पंतप्रधान तुम्ही झाल्यानंतर सर्वप्रथम काम काय करणार तर त्यांनी उत्तर दिलेलं होतं की सर्वप्रथम काश्मीर साफ करणार..! या आतंकवाद्यांवर कोणतंही केस फाईल न करता त्यांना रांगेने उभे करून गोळ्या घालणार आणि कोणताही जिहादी आतंकवादी मुस्लीम मग तो बांगलादेशचा असेल किंवा पाकिस्तानचा असेल इथे आपल्या देशात राहणार नाही. हे वाक्य होतं स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचं. आज त्यांचे सुपुत्र अजान स्पर्धा आयोजित करत आहेत तो भाग वेगळा आहे. सत्तेसाठी आज ते महाराष्ट्राची वाट लावणाऱ्यांच्या मांडीला मांडी लावून बसलेले आहेत हा भाग वेगळा आहे. परंतु बाळासाहेब ठाकरे हे म्हणाले होते हे खरं आहे. जसं काश्मीर फाईल घडलं तसं प्रत्येक राज्याची फाईल घडल्यावर सरकारचे आणि विशेष म्हणजे सुप्रीम कोर्टाचे डोळे उघडणार आहेत का?

**- चिदानंद चाबुकस्वार, सोलापूर.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## शहरात फौजदार चावडी पोलिसांचे मॉकड्रिल

**सोलापूर** : दोन दिवसा वर येऊन ठेपलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणूक तसेच संत बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त निघणारी मिरवणूक सण उत्सव या पार्श्वभूमीवर रस्त्यावर नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते.बऱ्याच वेळा अफवा किंवा एकीव माहितीतून गर्दीतून पळापळी होते.अशामुळे मोठा अनर्थ घडू शकतो. त्यावेळी एखादी घटना घडली तर पोलीस पथक किती सतर्क आहे. याचे प्रात्यक्षिक घेण्याकरीता गुरुवारी सकाळी चार हुतात्मा चौकात फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या अधिकारी पोलीस कर्मचाऱ्यांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली मॉकड्रिल घेण्यात आले. या संदर्भात बोलताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक उद्यासिंह पाटील म्हणाले की, रविवारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त शहरात भावी अशी मिरवणूक निघणार आहे. यामिरवणुकीत लाखो भीम अनुयायी सहभागी झालेले असतात तसेच शनिवारी अक्षय तृतीयेच्या दिवशी बसवेश्वर जयंती निमित्त मिरवणूक निघणार आहे.या निमित्ताने मोठ्या प्रमाणात नागरिक रस्त्यावर असतात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये.याची नागरिकांनी दक्षता घ्यावी शिवाय अशी एखादी घटना घडली तर अफवावर विश्वास न ठेवता जवळच असलेल्या पोलिसांकडून या संदर्भात विचारणा केली पाहिजे. जेणेकरून कोणतीही प्रकारची गर्दी रेटारीटी होणार नाही. अशी एखादी घटना घडली तर दहा मिनिटात या ठिकाणी हे पथक तात्काळ पोहोचेल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## ठाकूर सावदेकर विडी कारखाना कामगारांची २६ रोजी बैठक

**सोलापूर** : गेल्या वीस दिवसांपासून सोलापूर येथील ठाकूर सावदेकर विडी कारखान्याच्या कामगारांचे तयार विड्याचे माप घेण्यास मज्जाव केला जात आहे. विडी कामगार चिंताग्रस्त आहेत. हातावरचे पोट असणाऱ्या विडी कामगारांना परवडणारे नाही. विडी कामगारांचा हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी व्यापक बैठक घेण्यासबंधी गुरुवारी दत्त नगर येथे झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. सिटू संलग्न लाल बावटा विडी कामगार युनियन च्या वतीने बुधवार दिनांक २६ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता दत्त नगर लाल बावटा कार्यालय येथे ठाकूर सावदेकर विडी कारखान्यातील विडी कामगारांचे बंद काम पूर्ववत चालू करण्याबाबत ज्येष्ठ कामगार नेते माजी आमदार कॉ.नरसय्या आडम मास्तर यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक बोलावण्यात आली असून ठाकूर सावदेकर विडी कारखान्यातील कामगारांनी मोठ्या संख्येने बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन सिटू चे राज्य महासचिव अँड.एम.एच.शेख यांनी केले.

## जुन्या लाभार्थ्यांसाठी उत्पन्नाच्या दाखला अट रद्दची मागणी

**सोलापूर** : संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेणाऱ्या जुन्या लाभार्थ्यांसाठी उत्पन्नाच्या दाखल्याची अट रद्द करावी अशी मागणी लालबावटा दिव्यांग श्रमिक संघटनेचे अध्यक्ष बाबुलाल फणीबंद यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार मा. अंजली मरोड यांना एका निवेदनाद्वारे करण्यात आली. याप्रसंगी सचिव इलियास सिद्दिकी, खजिनदार अखिल शेख, सलीम शेखसंदी, सुनंदा गडदे, शालगर आणि इतर दिव्यांग बांधवांनी तहसीलदार अंजली मरोड यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले आणि सविस्तर चर्चा केली. यावर अंजली मरोड यांनी उत्पन्नाच्या दाखल्याबद्दल खुलासा देऊन येत्या काळात दिव्यांग लाभार्थ्यांना त्रास होणार नाही अशा सूचना संबंधित महा-ई-सेवा केंद्रांना दिल्या जातील अशी ग्वाही दिली. दिव्यांग बांधवांची होणारी गैरसोय थांबली नाही तर माजी आमदार नरसय्या आडम यांच्या नेतृत्वाखाली मार्गाने आंदोलन केले जाईल असा इशारा बाबुलाल फणीबंद यांनी दिला.

# स्त्रियांच्या शिक्षणामुळेच प्रगतिशील भारताची निर्मिती

## सेवासदन शताब्दी सांगता समारंभाच्या परिसंवादातील सूर

सुराज्य/सोलापूर



स्त्रियांच्या शिक्षण क्षेत्रातील भरीव योगदानामुळेच प्रगतिशील भारताची निर्मिती झाली, असा सूर पुणे सेवासदन संस्थेच्या सोलापूर शाखेच्या शताब्दी वर्षानिमित्त गुरूवारी आयोजित परिसंवादात उमटला.

संस्थेच्या शताब्दी वर्षाचा तीन दिवसीय सांगता समारंभ हुतात्मा स्मृती मंदिरात सुरू आहे. या समारंभाच्या दुसऱ्या दिवशी गुरुवारी 'स्त्रियांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान' या विषयावर परिसंवाद झाला. परिसंवादाचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले. याप्रसंगी पुणे सेवासदन संस्थेचे सरचिटणीस चिंतामणी पटवर्धन, ड. श्रीनिवास इनामती, आ. प्रणिती शिंदे, प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा, लेखिका मृणालिनी जोशी - कानिटकर, कवयित्री डॉ. वर्षा तोडमल, सोलापूर शाखेच्या अध्यक्षा शीला मिस्त्री, सचिवा प्रा. वीणा पतकी, संचालक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ. राजीव प्रधान, विजया निसर यांची प्रमुख उपस्थिती होती.

परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा होत्या. या परिसंवादात आ. प्रणिती शिंदे, लेखिका मृणालिनी जोशी - कानिटकर, कवयित्री डॉ. वर्षा तोडमल, डॉ. प्रिया निघोजकर यांनी सहभाग घेतला.

लेखिका मृणालिनी जोशी - कानिटकर म्हणाल्या, वैदिक काळापासून भारतात स्त्रियांना शिक्षण दिले जात असे. त्यामुळे ज्ञानाच्या क्षेत्रात स्त्रियांनी मोठी भरारी घेतली होती. मधल्या काळात स्त्री शिक्षणावर प्रतिबंध घातले गेले. परंतु स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, पंडिता रमाबाई अशा अनेक समाजसुधारकांनी पुन्हा एकदा स्त्रियांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. स्त्रीचा विकास म्हणजेच समाजाचा विकास असतो. सेवासदन सारख्या संस्थेच्या शैक्षणिक कार्यातून हे ठळकपणे दिसून येते.

डॉ. वर्षा तोडमल म्हणाल्या, स्त्री संतांनी शिक्षणाच्या माध्यमातून प्रबोधनाचे मोठे काम केले. संत मुक्ताई, संत जनाई, संत कान्होपात्रा यांनी समाजाला नैतिकतेचे शिक्षण दिले. अर्थार्जनासाठीच्या शिक्षणाबरोबरच जीवन विषयक शिक्षण देणे ही आवश्यक असल्याचे भारतातील स्त्री समाजसुधारकांचे ठाम मत होते. डॉ. अभय बंग, डॉ. राणी बंग, डॉ. प्रकाश आमटे, डॉ. मंदाकिनी आमटे, रेणू गावस्कर, शैला जाधव, वर्षा देशपांडे, सुषमा शर्मा अशा अनेक महिलांनी स्वातंत्र्योत्तर काळातही स्त्री शिक्षणात मोठे योगदान दिले.

आ. प्रणिती शिंदे म्हणाल्या, चौकटीच्या बाहेर शिक्षण देणे महत्त्वाचे आहे. शिक्षणाच्या पद्धतीत बदल झाल्यास समाजाची प्रगती अधिक वेगाने होईल.

डॉ. सुहासिनी शहा म्हणाल्या, भारतीय विशेषतः महाराष्ट्रातील समाजाला औपचारिक शिक्षणाची परंपरा संत साहित्यापासून आहे. मूल्य शिक्षणाची सुरुवात घरापासून झाली पाहिजे. मुलगा व मुलगी यांना समान संधी देण्याचे शिक्षण घरातून दिले तर समाजात समानता निश्चितच रुजेल. डॉ. प्रिया निघोजकर यांनी सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले.

### सांगता समारंभाचा आज शेवट

सेवासदन संस्थेचा शताब्दी वर्षानिमित्त समारंभाचा शेवट आज (शुक्रवारी) सायंकाळी ५ वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून खा. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी उपस्थित राहणार आहेत. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ज्ञानप्रबोधिनी पुणेचे अध्यक्ष गिरीश बापट भूषविणार आहेत. यावेळी विविध गुणदर्शनाचाही कार्यक्रम सादर होणार आहे.

## श्री काशिलिंग सामुदायिक विवाह सोहळ्यात २१ जोडपी होणार विवाहबद्ध; २७ सैनिक बांधवाचा देखील होणार सन्मान

सुराज्य/अक्कलकोट



जेऊर (ता.अक्कलकोट) येथे काशिलिंग देवस्थान ट्रस्ट व श्री काशीलिंग बहुऊद्देशिय संस्थेच्या वतीने शनिवार ता. २२ एप्रिल रोजी सायंकाळी ६:४५ वाजता अक्कलकोट रोडवरील श्री स्वामी समर्थ सांस्कृतिक भवन जेऊर येथे सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा आयोजित केला आहे.यावेळी २१ जोडपी विवाहबद्ध होणार आहेत तसेच सीमेवर कार्यरत तसेच शाहिद सैनिक कुटुंबीय अशा एकूण २% सैनिक बांधवाचा सन्मान सोहळा होणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष तथा जिल्हा परिषद माजी कृषी सभापती मल्लिकार्जुन पाटील यांनी दिली आहे.

यावेळी विविध मठाचे मठाधीश उपस्थित राहणार आहेत.

ग्रामीण भागात सतत पडणाऱ्या दुष्काळामुळे आर्थिक अडचण तसेच वाढत चाललेली प्रचंड महागाई यामुळे नागरिकांना आपल्या मुलामुलींची लग्न लावणे आणि त्याची जबाबदारी हे खूपच खर्चिक आणि न झेपणारे ठरत आहे.श्री काशीलिंग देवस्थान ट्रस्ट व बहुऊद्देशिय संस्थेच्या वतीने यंदा जेऊरला कोरोनाकाळ वगळता सलग ८ व्या वर्षी सामुदायिक विवाह सोहळा आयोजीला जात आहे.या संस्थेत एकूण २०० मित्रपरिवार सदस्य एकत्र येऊन तन,मन धनाने योगदान देत आहेत.काशीलिंग बहुउद्देशीय संस्थेच्या मल्लिकार्जुन पाटील व मित्रपरिवारांकडून ६ वर्षात १३४ जोडपे विवाहबद्ध झाली आहेत तर चालू वर्षी एकूण २१ जोडप्यांचा विवाह त्यात्या धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे लग्न सोहळा पार पडणार आहे.या विवाह सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे.दरवर्षी साधारण पन्नास हजार वऱ्हाडी उपस्थित राहत असतात.यात प्रामुख्याने वधू वरांना पोशाख, मणी-मंगळसूत्र, वऱ्हाडी मंडळींना, गावातील मुख्य रस्त्यावरून वधू वरांची मिरवणूक, भोजन, शिदोरी आदींची व्यवस्था केली आहे. या विवाह सोहळ्याचे नियोजन काशीलिंग देवस्थान ट्रस्ट व काशिलिंग बहुउद्देशीय संस्था तसेच कार्यकर्ते व ग्रामस्थ मंडळी जेऊर हे करीत आहेत.

### सैनिक सन्मान सोहळा हे यावेळचे वेगळेपण

या ट्रस्टच्या वतीने आणि मल्लिकार्जुन पाटील यांच्या संकल्पनेतून अक्कलकोट तालुक्यातील सध्या सीमेवर कार्यरत असलेल्या आणि गावाकडे आलेल्या २२ सैनिकांचा आणि तालुक्यातून सेवेत असताना शहिद झालेल्या जवानांच्या ५ कुटुंबियांचा सन्मान देखील केला जाणार आहे.

## म.बसवेश्वर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी देशमुख

सुराज्य/पिलीव

महात्मा बसवेश्वर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्ष पदी देशमुख. माळशिरस तालुक्यातील पिलिव येथे जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर यांची जयती जरवर्शी मोठ्या थाामाटाने केली जाते. याच जयंतीच्या पाश्र्भूमीवर बैठकीचे आयोजन विरशैव लिंगायत समाजातर्फे करण्यात आले होते.

यावेळी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. व उत्सव समिती स्थापन करण्यात आली उत्सव समितीच्या अध्यक्ष पदी संकेत देशमुख यांची तर उपाध्यक्षपदी प्रथमेश घोंगडे यांची बिनविरोध निवड झाली. यावेळी समाजाचे अध्यक्ष शुभजित नष्टे, माजी उपसरपंच नानासाहेब देशमुख, शिवा संघटनेचे कैलास घोंगडे, ग्राम. सदस्य अविनाश जेऊरकर, डॉ.तुषार गुळभिले, गणेश देशमुख, ऋषिकेश देशमुख, भाऊ स्वामी, सुहास कोल्हे व अन्य समाज बांधव उपस्थित होते.

## महिलेवर सामूहिक दुष्कर्मप्रकरणी विष्णू बरगंडे याचा जामीन फेटाळला

सुराज्य/सोलापूर

एका महिलेवर सामूहिक दुष्कर्म केल्याप्रकरणी विष्णू उर्फ गुलाब चंद्रकांत बरगंडे (वय-४%, रा. अवसे वस्ती) याचा जामीन अर्ज अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश के. डी. शिरभाते यांनी फेटाळला.

बरगंडे व मुख्य आरोपी गणेश कैलास नरळे यांनी संगनमत करून फिर्यादीस ठार मारण्याची व तिची बदनामी करण्याची धमकी देऊन पुणे येथे तिच्यावर सामूहिक दुष्कर्म केले, अशा आशयाची फिर्याद पीडितेने दोघांविरुध्द दाखल केली होती. दरम्यान फौजदार चावडी पोलिसांनी नरळे यास अटक केली होती. त्यानंतर त्याच्याविरुद्ध भा.दं.वि. कलम ४१% अंतर्गत दोषारोपपत्र पाठवून बरगंडे यास गुन्ह्यातून वगळण्याचा अहवाल न्यायालयात दाखल केला होता. त्यानंतर फिर्यादीने या अहवालाविरुद्ध उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने तपास आयपीएस अधिकाऱ्याने करावा असे निर्देश दिल्यानंतर हा तपास पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्याकडे वर्ग केला होता. पोलिसांनी बरगंडे यास अटक केली, त्यानंतर त्याने जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. त्यावर सरकारी वकील, मूळ फिर्यादीच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकून न्यायाधीशांनी बरगंडे याचा जामीन फेटाळला. यात सरकारतर्फे अॅड. प्रदीपसिंग राजपूत, मूळ फिर्यादीतर्फे अॅड. प्रशांत नवगिरे, अॅड. श्रीपाद देशक तर आरोपीतर्फे अॅड. शांतवीर महिंद्रकर यांनी काम पाहिले.

## आषाढीपासून पांडुरंगाची सेवा करता येणार

सुराज्य/पंढरपूर

राज्यभरातील भाविकांकडून श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरामध्ये मोफत सेवा करण्याची इच्छा असून त्या अनुषंगाने येत्या आषाढीपासून अशा सेवेकरी वारकऱ्यांचे अर्ज स्वीकारण्यासाठी एक केंद्र सुरू करण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी अतुल ठोंबरे यांनी दिली.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीची बैठक भक्त निवास येथे पार पडली. यास मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य शिवाजी महाराज मोरे, ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, अॅड.माधवी निगडे, प्रकाश महाराज जवंजाळ, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड, लेखाधिकारी अनिल पाटील आदी उपस्थित होते.

बैठकीनंतर बोलताना ठोंबरे यांनी, देशभरातील विविध धार्मिक मंदिरामध्ये भक्त मोफत सेवा देतात. त्याप्रमाणे पंढरीच्या पांडुरंग मंदिरात देखील सेवा करण्याची अनेक भाविकांनी, संस्थांनी विनंती केली आहे. याची दखल घेऊन आषाढी वारीपासून अशा भाविकांचे अर्ज स्वीकारले जाणार आहेत. दरम्यान याबाबत सेवेकरी वारकऱ्यांचा आराखडा तयार केला जात आहे. यामध्ये सेवेकऱ्यांना कोठे सेवा देण्यात यावी, किती भाविकांची गरज आहे आदीबाबत पुढील बैठकीत चर्चा करण्यात येणार आहे. आषाढीमध्ये अशा सेवेकऱ्यांसाठी केंद्र सुरू केले जाणार आहे. तसेच इच्छुक भाविकांच्या संख्येवरून त्यास मंदिरात, ६५ एकर, दर्शन रांग, पोलीस मदत केंद्र, दर्शन मंडप आदी ठिकाणी सेवा करण्याची संधी दिली जाणार आहे. मोठ्या संख्येने भाविक उपलब्ध झाल्यास वर्षभर हा प्रयोग राबविला जाणार असल्याची माहिती ठोंबरे यांनी दिली.

दरम्यान भाविकांनी दिलेले सोन्याचे दागिने वितळविण्याचा निर्णय मंदिर समितीने घेतला आहे. मात्र मागील अनेक महिन्यापासून याबाबत निर्णय झाला नाही. यावर मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी, समितीस पूर्णवेळ कार्यकारी अधिकारी नसल्याने व अध्यक्षपद रिक्त असल्याने हे काम रखडले असल्याची माहिती दिली. परंतु सोने वितळविण्याचा निर्णय अंतिम झाला असून हे काम मिंट या कंपनीला देण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

## अक्कलकोट बाजार समितीत ५५ जणांची तर दुधनीत ४३ जणांची माघार

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट बाजार समितीसाठी एकुण १०४ अर्जापैकी गुरूवारी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी ५५ उमेदवारांनी अर्ज माघारी घेतल्याने १८ जागेसाठी ४४ उमेदवार रिंगणात राहिले तर दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी ७७ अर्जापैकी ४३ उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले तर १६ जागेसाठी एकुण ३२ उमेदवार रिंगणात राहिले अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिली.

काही उमेदवारांनी दोन अर्ज भरले होते. २० एप्रिल पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत होती. २१ एप्रिलला उमेदवारांना चिन्ह वाटप केले जाईल व यादी प्रसिद्ध केली जाईल. आणि अक्कलकोट बाजार समिती साठी २८ एप्रिलला मतदान होणार आहे.व ३० एप्रिल ला निकाल घोषीत होणार आहे.तर दुधनी बाजार समिती साठी ३० एप्रिल ला मतदान व ३० एप्रिल ला च निकाल लागणार आहे.

## प्लास्टिकबंदी मोहिमेअंतर्गत ४ व्यवसायिकांवर कारवाई

### २० हजार रुपये दंड व ५८ किलो प्लास्टिक जप्त

सुराज्य/सोलापूर

प्लास्टिक बंदी मोहिमेअंतर्गत महापालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या माध्यमातून सोलापूर शहरातील विविध १६७ आस्थापनांची तपासणी करून चार व्यवसायधारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. २० हजार रुपये दंड वसूल करण्यात आला असून एकूण ५८ किलो प्लास्टिक गुरुवारी जप्त करण्यात आले आहे, अशी माहिती मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांनी दिली.

महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली प्लास्टिक बंदी मोहिमेअंतर्गत मुख्य आरोग्य निरीक्षक व आरोग्य निरीक्षकांनी सोलापूर शहरात विविध १६७ दुकानांची तपासणी केली. शहरातील काळी मशीद परिसर, सुपर मार्केट, एसटी स्टँड, सिद्धेश्वर मार्केट यार्ड, कोंत्तम चौक, ७० फूट रोड परिसर, आसरा चौक,



सैफुल, मरीआई चौक, विजापूर रोड, मधला मारुती, फुलारी गल्ली, अशोक चौक आदी परिसरातील दुकानांची , व्यवसायधारकांची तपासणी करण्यात आली. यामध्ये सिद्धेश्वर मार्केट यार्ड, कोंत्तम चौक, मधला मारुती फुलारी गल्ली, अशोक चौक परिसरातील चार व्यवसाय धारकांवर प्रत्येकी पाच हजार रुपये दंडात्मक कारवाई करून एकूण २० हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे तर एकूण ५८ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे. या मोहिमेत आरोग्य निरीक्षक सूर्यकांत लोखंडे, नडीमेटला, केदारनाथ गोटे, तमशेट्टी, इंगळे, नागटिळक, अन्वर शेख, नल्लामंदू आदींनी ही कारवाई केली.

## कुमठे महालक्ष्मी यात्रेनिमित्त मिळणार बौध्दिक मेजवानी; पंजाबराव डख, कीर्तनकार कनेरकर महाराज येणार

सुराज्य/सोलापूर

कुमठे येथील ग्रामदैवत श्री माता महालक्ष्मी यात्रा महोत्सवास शनिवार, २२ एप्रिलपासून प्रारंभ होत असून या यात्रा महोत्सवानिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमाबरोबरच शेती आणि हवामान अभ्यासक पंजाबराव डख व नामवंत कीर्तनकार ह.भ.प. सोपानदादा महाराज कनेरकर यांची बौध्दिक मेजवानी मिळणार आहे.

शनिवार २२ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता मानाच्या नंदीध्वजांच्या तैलाभिषेक सोहळ्याने यात्रेस प्रारंभ होणार आहे. रविवार, २३ रोजी सायंकाळी ७ वाजता मानाच्या नंदीध्वजांचा अक्षता सोहळा व मिरवणूक काढण्यात येणार आहे.

सोमवार, २४ रोजी सकाळी १० वाजता कुमठ्यातील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात ज्येष्ठ हवामान शास्त्रज्ञ व शेती अभ्यासक पंजाबराव डख यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. मंगळवार, २५ रोजी सायंकाळी ७ वाजता महालक्ष्मी मंदिरासमोर नामवंत कीर्तनकार ह.भ.प. सोपानदादा कनेरकर महाराज यांचे कीर्तन होणार आहे.

याशिवाय यात्रेपूर्वी शुक्रवार, २१ रोजी सायंकाळी ५ वाजता बसवेश्वर तरुण मंडळ व





ग्रामस्थांच्यावतीने कुमठे-सोरेगाव रोडवरील बसण्णा म्हेत्रे वस्ती येथे काशी जगद्गुरू डॉ.मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामीजी यांचा अड्डपालखी महोत्सव व धर्मसभेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी माळकवठे मठाचे श्री.ष.ब्र. पंचाक्षरी शिवाचार्य महास्वामी व नागणसूर मठाचे श्री ष.ब्र.श्रीकंठ शिवाचार्य महास्वामी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे उद्घाटन श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचे मार्गदर्शक संचालक धर्मराज काडादी यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी माजी आमदार दिलीप माने हे राहणार आहेत. यावेळी माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे, माजी नगरसेवक जयकुमार माने, पंचायत समितीचे माजी सभापती गुरूसिध्द म्हेत्रे यांची उपस्थिती राहणार आहे. या सर्व कार्यक्रमांचा कुमठे व पंचक्रोशीतील भाविक व शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन यात्रा महोत्सव पंच कमिटी व बसवेश्वर तरुण मंडळाने केले आहे.

## स्वागत नगरातील नागरी समस्या सोडवा अन्यथा तीव्र आंदोलन

### ठाकरे गट महिला आघाडीचे निवेदन

सुराज्य/सोलापूर

स्वागत नगर भाग १,२,३ मधील गढूळ पाणीपुरवठ्यासह नागरी समस्या सोडवाव्यात अशी मागणी निवेदनाद्वारे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे महिला आघाडीच्या वतीने गुरुवारी निवेदनाद्वारे अतिरिक्त आयुक्तांकडे केली आहे.



येथील समस्यांकडे दुर्लक्ष केले जात असून समस्या सोडवण्याऐवजी त्यात वाढ होत असल्याची दुर्दैवी परिस्थिती स्वागत नगर भाग १,२,३ मध्ये आहे. या परिसरात हातावर पोट असणारा, सुशिक्षित रहिवासी वर्ग राहत असून स्वागत नगर भाग १,२,३ मध्ये ८ दिवसाआड रात्री अपरात्री कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. सर्व कामकाज सोडून केवळ पाण्याच्या पाठीमागे रहिवाशांची धावपळ होत आहे. या भागातील गटारी तशाच तुंबलेल्या अवस्थेत आहेत.

सदरच्या गटारी नागरिकांना स्वतः च्या हाताने स्वच्छ कराव्या लागत असून तुंबलेल्या गटारीमुळे स्वागत नगरात आरोग्याच्या विविध समस्या निर्माण होत आहेत. समस्याबाबत संबंधित झोन अधिकाऱ्यांना यापूर्वी दोन वेळा लेखी निवेदन दिले आहे. त्यांनी आमच्या समस्यांना व निवेदनाला केराची टोपली दाखवली आहे असा आरोप रहिवाशांनी केला आहे. लवकरात लवकर जर आमच्या सर्व समस्या सोडवल्या नाहीत तर तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे महिला आघाडीच्या वतीने देण्यात आला आहे. अतिरिक्त आयुक्तांना निवेदन देतेवेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख प्रिया बसवंतीउपशहरप्रमुख मीनल साठे, यांच्यासह स्वागत नगरातील महिला वर्ग उपस्थित होता.

# टिकेची झोड उठल्यानंतर महापालिकेला आली जाग; पावसाळ्यापूर्वी शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजवणार

## १० कोटींची काढली निविदा; लवकरच सुरू होणार कामे

सुराज्य/सोलापूर

**महापालिकेने सोलापूर शहरातील कामांसाठी रस्ते खोदण्याची परवानगी विविध कंपन्यांना दिली. मात्र खोदकाम झाल्यानंतर संबंधित कंपनीने रस्ते दुरुस्त केले नाहीत. त्यामुळे शहरात अपघातांचे प्रमाण वाढले आहे. महापालिकेच्या या कारभारामुळे शहरवासियांकडून रस्त्यांच्या दुरावस्था संदर्भात टीकेची जोड उठल्यानंतर अखेर महापालिकेने आता शहरातील रस्त्यावरील खड्डे बुजवण्यासाठी दहा कोटींची निविदा काढली आहे. पावसाळ्यापूर्वी शहरातील रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे नियोजन महापालिका करत आहे.**

गेल्या दोन वर्षांपासून गॅसलाईन, रिलायन्स केबल, वोडाफोन, आयडीया आणि स्मार्ट सिटीअंतर्गत सीसीटीव्ही कॅमेरा



बसविणे अशा विविध कामांकरिता रस्ते खोदाईचे काम सुरू आहे. याबदल्यात महापालिकेने संबंधित कंपनीकडून रस्ते खोदाईचे पैसे भरून घेतले. मात्र रस्ते पूर्ववत केले नाही. या खोदकामाप्रसंगी शहरातील अनेक ठिकाणचे ड्रेनेजलाईन फुटले, नळजोडणी तुटल्या आहेत.या तोडफोडीच्या दुरुस्तीवरून संबंधित कंपनी व महापालिका अधिकारी यांच्यामध्ये वादावादी सुरू आहे. प्रशासनाकडे आम्ही नुकसानापोटी रक्कम भरपाई भरूनच परवानगी घेतली असे कंपनीचे म्हणणे आहे तर महापालिका अधिकारी केवळ रस्ता दुरुस्तीपोटीची रक्कम भरून घेण्यात आल्याचे सांगतात. या प्रकारात मात्र नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. दोघांमधील वादांमुळे रस्त्यावरील खड्डे आहे तसेच आहेत यामुळे शहरात अपघातांचे प्रमाण वाढले आहे

जुळे सोलापूर भागात गॅसलाईन, जिओ केबलसाठी १५ कि.मी अंतराचे खोदाई झाली. या रस्त्यांची दुरुस्ती झाली नाही. शहरवासियांनी आवाज उठविल्यानंतर महापालिकेने रस्ता दुरुस्तीचे काम हाती घेतले. मात्र प्रत्यक्षात अपेक्षित असा रस्ता झाला नाही. त्यामुळे आता टीकेची जोड उठल्यानंतर महापालिकेने झोननिहाय रस्त्यावरील खड्ड्यांच्या दुरुस्तीसाठी दहा कोटींची निविदा काढली आहे. या कामांना सुरुवात होणार असून पावसाळ्यापूर्वी सर्व खड्डे बुजवण्याची नियोजन महापालिकेकडून करण्यात येत आहे.

### नियोजनबध्द काम करून रस्ते दुरुस्त करू : कारंजे

गॅसलाईनसह विविध महानेटचे केबल टाकण्यासाठी रस्त्याच्या बाजूने खोदाई होते. तसेच या योजना शासनाचे असल्याने त्यांना परवानगी देणे बंधनकारक आहे. रस्त्याच्या नुकसानीपोटी संबंधित कंपनीकडून पैसे भरून घेतले आहे. खोदाई झाल्यानंतर त्वरित रस्ता पूर्ववत व्हावा आणि पावसाळ्यापूर्वी शहरातील रस्ते दुरुस्त व्हावेत, म्हणून प्रथमच अशी निविदा प्रक्रिया राबवून नियोजनबध्द काम करण्यात येत आहे, असे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी सांगितले.





## डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीनिमीत्त स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी केला १८ तास अभ्यास

**पंढरपूर** : महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीचे औचित्य साधून दि.१३ एप्रिल रोजी गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित इंजिनिअरिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सलग १८ तास अभ्यास करून महामानव डॉ.आंबेडकर यांना अभिवादन केले. या अदभूत उपक्रमाचे पंढरपूर पंचक्रोशीत कौतुक होत आहे. स्वेरीच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाच्या मेसा’ (मेकॅनिकल इंजिनिअरींग स्टुडंट्स असोसिएशन) च्या पुढाकाराने सलग १८ तास अभ्यास करण्याची संकल्पना वरिष्ठांसमोर मांडली.अशा स्तुत्य उपक्रमाला स्वेरीचे प्रशासन नेहमीच विनाविलंब हिरवा कंदील दाखवत असते. संस्थेचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज प्रा.एम.एम. पवार यांच्या सहकार्याने, मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ.संदीप वांगीकर व मेसाचे समन्वयक प्रा.संजय मोरे, मेसा’ विद्यार्थी अध्यक्ष निलेश ढेकळे तर उपाध्यक्षा अवंतिका आसबे यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी आयोजिल्याप्रमाणे इंजिनिअरींगच्या सर्व विभागातील विद्यार्थी लायब्ररीच्या नूतन इमारतीमध्ये अभ्यासिका कक्षात तर विद्यार्थीनींनी स्वतंत्र अभ्यासिका कक्षात बैठक व्यवस्था केली होती. सकाळी ६ ते रात्री १२.०० वाजेपर्यंत विद्यार्थ्यांनी एकाग्रपणे अभ्यास केला. सलग १८ तास अभ्यास करण्याचा विक्रम करून या विद्यार्थ्यांनी महामानव डॉ. आंबेडकर यांनी घालून दिलेल्या वाचन संस्कृतीची जपणूक केली आहे. यामध्ये कमवा आणि शिका’ योजनेमधील व सर्व विभागातील असे मिळून जवळपास २०० विद्यार्थी व विद्यार्थीनींनी सलग १८ तास अभ्यास करण्याच्या या उपक्रमात सहभागी झाले होते. अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासिकेला रयत शिक्षण संस्थेच्या माढा येथील महाविद्यालयाचे डॉ.संतोष राजगुरू यांच्यासह स्वेरीचे अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापकांनी भेट देवून पाहणी केली व या उपक्रमाचे मनस्वी कौतुक केले.

## महात्मा बसवेश्वर मनामनात – बसव जयंती घराघरात अभियान





**सोलापूर** : महात्मा बसवेश्वर जयंती शनिवारी अक्षय तृतीय दिवशी साजरी होत आहे. वीरशैव सेवा संघ महात्मा बसवेश्वर मनामनात - बसव जयंती घराघरात अभियान राबवित आहे.यासाठी घरा घरात जागृती करण्यात येत आहे अशी माहिती वीरशैव सेवा संघाचे सचिव सिद्धारुढ निंबाळे यांनी दिली आहे.सर्व बसव भक्तानी व नागरिकांनी आपल्या घरात महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे आकर्षक देखावा सहित पूजन करावे,प्रत्येक कुटुंबीयांनी बसवेश्वर जयंती शुभेच्छा देताना किमान पाच बसव वचनांचा प्रसार करावा,प्रत्येक कुटुंबीयांनी घरावर ध्वज फडकवावे यासाठी वीरशैव सेवा संघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते अभियान राबवित आहेत.तसेच सर्व शासकिय, निमशासकिय व खाजगी कार्यालयात महात्मा बसवेश्वर जयंती सर्वांनी स्वयंस्फुर्तीने करावे, असे आवाहनही सचिव सिद्धारुढ निंबाळे,शहर अध्यक्ष चंद्रकांत चोळके,शहर सचिव गंगाधर पाटील,जिल्हा संघटक सिद्धेश्वर होनराव,शहर संघटक सिद्धाराम कोनापुरे,तसेच आप्पासाहेब नष्टे,संजय लोणी,अध्यक्ष विश्वनाथ आमणे आदींनी केले आहे.



## दीपकआबा साळुंखे पाटील यांच्यावतीने जवळा येथे इफ्तार पार्टीचे आयोजन

**सांगोला** : जवळा तालुका सांगोला येथे सालाबाद प्रमाणे मुस्लिम समाजातील पवित्र अशा रमजान ईदच्या २७ व्या रोजा निमित्त महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष,मा. आ. दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. जवळा ता.सांगोला येथील प्रत्येक मुस्लिम कुटुंबांना या इफ्तार पार्टीचे आमंत्रण देऊन साळुंखे पाटील कुटुंबीयांकडून सर्वांना शुभेच्छा देण्यात येत असतात. या वर्षीच्या इफ्तार पार्टीसाठी अस्थिरोग तज्ञ डॉ.पियुषदादा साळुंखे पाटील यांनी हजर राहून सर्व मुस्लिम बांधवांना रमजान ईद सणाच्या शुभेच्छा दिल्या. या इफ्तार पार्टीसाठी बाबासाहेब इमडे, बाळासाहेब गावडे, अशोक भोसले, नागेश घुले, अजित देशमुख, विजय सरगर - पाटील, प्रमोद साळुंखे पाटील यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थ व मोठ्या प्रमाणावर मुस्लिम समाजातील लोक यावेळी उपस्थित होते.

## करिअरचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी

**सोलापूर** : मेडिकल आणि इंजिनिअरींग क्षेत्रात करिअरचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश अभ्यासाचा मार्ग सुकर करण्यासाठी आकाश बायजुसने सोलापुरात पदार्पण केले आहे.पूर्ण प्रशिक्षित मार्गदर्शक एमएचटी-सीइटीच्या चाचणी पूर्व तयारीकरिता मेडिकल आणि इंजिनिअरींग क्षेत्रात पदार्पण करू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही सुवर्णसंधी असल्याचे आकाश बायजुसचे सीबीएच मृत्युंजय सिंह आणि डेप्युटी डायरेक्टर सुरेश सिंह यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. या पत्रकार परिषदेस सीबीएच,मृत्युंजय सिंह, डेपोटी डायरेक्टर सुरेश सिंग,असिस्टंट डायरेक्टर दीपक सिक्युरिया आणि बँच हेड राहुल बोध्दुल उपस्थित होते.

## तुकाराम मिसाळ यांचे निधन



**अकलूज** : वाघोली (तालुका माळशिरस) येथील तुकाराम शंकर मिसाळ यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, विवाहित मुली, नातवंडे असा परिवार असून वाघोली वि.का.वी. संस्थेचे माजी चेअरमन महावीर संभाजी मिसाळ यांचे ते चुलते होते.

## शिवाजी महाराजांकडून जगाला आश्चर्य वाटेल असे कर्तृत्व : इदाते

सुराज्य/नातेपुते





वयाच्या दहाव्या वर्षी संघाच्या शाखेत मी आलो आणि पहिले चित्र पाहिले ते शिवाजी महाराजांचे तेव्हापासून आजपर्यंत त्यांच्या विचाराच्या प्रकाशामध्येच आहे. आपल्या देशाच्या अत्यंत विपरीत काळामध्ये संपूर्ण समाजाला ताठ मानेने जगण्यासाठी उभे केले. देशाची दयनीय अवस्था असताना छत्रपती शिवाजी महाराज सगळ्या जगाला आश्चर्य वाटेल असे कर्तृत्व केले, असे मत पद्मश्री भिकोजी तथा दादाजी इदाते यांनी व्यक्त केले .

ते नातेपुते येथे शिवजयंती निमित्त घेण्यात आलेल्या व्याख्यानमाले प्रसंगी बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, माजी आमदार आर.जी. रुपनवर, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख, तसेच डॉ. एम. के. इनामदार, डॉ. एम. पी.मोरे, माजी सरपंच अमरशील देशमुख, उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमुख उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात बोलत असताना सोलापूर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख म्हणाले की, नातेपुते गावामध्ये महत्त्वाचे अशी विभूती आजच्या कार्यक्रमाला लाभली भटक्या विमुक्त जमातीसाठी दलित वंचितांसाठी अतिशय मोठे सामाजिक काम या देशांमध्ये दादाजी इदाते यांनी केले आहे. अनेक मोठी पदे मोठे पुरस्कार मिळवले आहेत. बहुजन समाजाला संघाच्या जवळ आणण्याचे काम इदाते दादांनी केले असल्याचे मत बाबाराजे देशमुख यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुनील राऊत यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन औदुंबर बुधावले व प्रशांत सरुडकर यांनी केले.



## डॉ.आंबेडकर यांच्यामुळेच भारतीय स्त्रिया प्रगतीपथावर : उमेश पाटील

सुराज्य/मोहोळ

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या यांनी स्त्रियांना दिलेल्या हक्क व अधिकार यामुळे आपल्या देशात सर्वच क्षेत्रात स्त्रिया प्रगती करत आहेत प्रगती पथावर पोचत आहेत असे विचार राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते उमेश पाटील यांनी मांडले.

नरखेड ता मोहोळ येथे रमाई ग्रुप व आमदार रमेश कदम समर्थक यांच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी उमेश पाटील बोलत होते. यावेळी नरखेडचे सरपंच यशवंत मोटे ग्राप पंचायत सदस्या वैशालीताई बनसाडे आमदार रमेश कदम समर्थक सुधीर खंदारे पोलिस अधिकारी आदलिंगे आदी मान्यवर उपस्थित होते यावेळी उपस्थित मान्यवरांचे हस्ते प्रतिमापुजन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमास महिलांची उपस्थिती मोठी होती सर्वच उपस्थित महिलांना साडया वाटप करण्यात आल्या.

यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची रथातून मिरवणुक काढण्यात आली मंडळाचे अध्यक्ष चेतन सकट उपाध्यक्ष अमोल मस्के शिस्तबद्ध मिरवणूक काढून आजच्या तरुणा समोर नवा आदर्श दाखवून दिला यासाठी चेतन सकट अमोल मस्के सुरज मस्के, सागर पवार, रोहित पवार, नवनाथ कसबे, अभि महापुरे विक्रम धोत्रे, मनोज (आप्पा) मोटे,गणेश पाटील, पांडुरंग पाटील, हनुमंत पवार, रविराज मस्के, किरण जाधव, अजित पवार, महेश कसबे, संकेत गायकवाड, तेजस मस्के, महादेव मोटे, गणेश (वस्ताद) मोटे, नाना कसबे, आकाश फडतरे, महादेव आवडे,ज्योतिबा कसबे, शाहीर मोरे, दशरथ पवार, समाधान पवार, राम कसबे, धर्मराज मस्के,संतोष मस्के, व स्वराज्य प्रतिष्ठान नरखेड आदी सह युवा वर्ग सहभागी झाले होते शेवटी चेतन सकट यांनी सर्वांचे आभार मानले.



## विद्यानिकेतन प्रशालेत ३० वर्षांनंतर माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

सुराज्य/सोलापूर

तीस वर्षांपूर्वी शाळेतून निरोप घेऊन गेलेली ही मुलं . डॉक्टर,इंजीनियर, न्यायाधीश तर कोणी उद्योजक झाले. आपआपल्या क्षेत्रात स्थिरस्थावर झालेल्या विद्यार्थ्यांना आपल्या शाळेची आणि प्रकर्षाने गुरुजनांची आठवण झाली.

प्रवासात अचानक दोन मित्रांची भेट झाली. शालेय जीवनातील सोनेरी आठवणींना उजाळा मिळाला .त्यातून सर्वांनी एकत्र यायचे ठरले . समकालीन शालेय मित्रांशी संपर्क साधण्यासाठी ...पुल्ली यांनी पुढाकार घेत सहा महिन्यात सर्व शिक्षक आणि जवळपास शंभर ते सव्वाशे विद्यार्थ्यांपर्यंत पोहचण्यात यश आले. व्हाट्स ग्रुप वरून एकमेकांशी संवाद साधत शिक्षकांचा सन्मान सोहळ्याच्या निमित्ताने एकत्र भेटण्याचे ठरले .

शहराजवळील निसर्ग रम्य ठिकाणी आयोजित या कार्यक्रमात सर्व शिक्षकवृंद आवर्जून उपस्थित होते . प्रिय गुरुजनांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी एकत्र जमली होती. शिक्षकवृंद आण्णाराव नागूर, मल्लिकार्जुन भुसारे, श्रीशैल पाटील, सिद्धरामेश्वर हिरेमठ, सुनील व्हसाळे, सुरेश कोळी, सुधाकर कटारे, तुकाराम रानभरे, मल्लिकार्जुन स्वामी, विमल पवाडे, रेखा स्वामी, मंगला पाटील यांचा ग्रँथ, सोलापुरी टॉवेल अन सन्मान चिन्ह देण्यात आला. यावेळी प्रसाद पुल्ली, गुरुशांत करकमकर, दयानंद हिबारे, शाम क्षीरसागर, चंद्रकांत बुरबुरे, सिद्राम एकबोटे, भालचंद्र सपकाळ, मुरलीधर गंजी,श्रीनिवास कुने,आनंद कवडे,अनंत पेंडकर, बालाजी कोमटी, दीपक टोंणपे हे विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला.

## चांदापुरीत रमजान ईद निमित्त इफ्तार पार्टीचे आयोजन

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथे चांदापुरीचे सरपंच जयवंत सुळ व उपसरपंच तात्यासाहेब चोरमले यांनी मुस्लिम समाजाच्या पवित्र रमजान ईद निम्मित मुस्लिम बांधवांनसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन केले यानिमित्त सर्व मुस्लिम बांधवांनसाठी चांदापुरी चौक याठिकाणी असणाऱ्या मशिदीत भोजणाची व्यवस्था केली होती. यावेळी सरपंच जयवंत सुळ, उपसरपंच तात्यासाहेब चोरमले, मौलाना सलीम रिजवी,शाहीद शेख,मोहनखान पठाण, बाबु पठाण, खन्ना पठाण,तोहीब शेख,अहमद पठाण,साजिद पठाण, नवाज पठाण यांच्यासह समाजबांधव यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कुर्डूवाडीत वाहनातील कलिंगड काढण्यास विरोध केल्याने चालक व मालकास मारहाण

सुराज्य/कुर्डुवाडी

मुंबई येथे कलिंगडे विक्रीस घेऊन निघालेल्या पिकअप वाहनातून, कलिंगडे काढण्यासाठी विरोध का केला म्हणून, वाहन चालक रूषिकेश गवळी, व्यापारी तानाजी जाधव यांना कुर्डूतील वजन काट्या जवळ पाच जणांनी बेदम मारहाण करून, जखमी करून, खिश्यातले जबरदस्तीने १० हजार रूपये रोख काढून नेले.

माहिती अशी की, दि. १८ एप्रिल मंगळवार रोजी, गवळीवाडी ता.माढा येथील पिकअप वाहन हे बारलोणी येथील शेतकरी बिभीषण धुमाळ यांच्या शेतातून, कलिंगडे पिक मध्ये भरून व्यापारी तानाजी जाधव यांना घेऊन, मुंबईत विक्रीसाठी कलिंगड भरलेल्या वाहनाचे वजन करण्यासाठी कुर्डू गावातील अमोल गायकवाड यांच्या वजन काट्यावर रात्री ९ वा. वजन करून, निघाले असता त्या ठिकाणची सचिन वजाळे, अमोल धोत्रे,संदिप धोत्रे आणि अनोळखी दोघे जण येऊन वाहनातील कलिंगड घेऊ लागले. त्यांना मालाचे वजन झाले असून,सचिन यास कलिंगडे काढू नको असे म्हणल्यावर त्यांने पिकअप वाहनाची चावी काढून घेतली. तसेच शीट खाली ठेवलेली टॉमी काढून, माझ्या खांद्यावर मारून, व्यापारी तानाजी जाधव यांना मारहाण करून, पँटीच्या खिश्यातली रोख १० हजाराची रोकड जबरदस्तीने काढून तेथून दुचाकीवरून निघून गेले. कुर्डूवाडी पोलिस ठाण्यात फिर्यादीवरून एकूण पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# तात्काळ कमिशन मिळावे अन्यथा संपाचा इशारा

## सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील स्वस्त धान्य दुकानदार संघटना आक्रमक

सुराज्य/अकलूज

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील रास्त भाव धान्य दुकानदार संघटनेच्या वतीने तहसीलदार माळशिरस यांना तात्काळ कमिशन मिळावे अशा आशयाचे निवेदन देण्यात आले असून तात्काळ मागणी मान्य न झाल्यास संपावर जाण्याचा इशारा देण्यात आला.

नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यातील रेगुलर धान्याचे भरणा दुकानदारांनी केला असून ते पैसे दुकानदारांना अद्याप माघारी मिळालेले नाहीत व एक जानेवारी २०२३ पासून केंद्र सरकारने मोफत अन्नसुरक्षा योजनेची घोषणा करून धान्य वाटप चालू केले आहे. परंतु गेले चार ते पाच महिने पासुन दुकानदारांना एक रुपयाही कमिशन शासनाने दिलेले नाही. वारंवार कमिशन मागणी करून सुद्धा चार ते पाच महिन्यापासून धान्य दुकानदार हे विना मोबदला ग्राहकांना सेवा आहेत. कमिशन न मिळाल्यामुळे धान्य दुकानदारांची परिस्थिती कोलमडलेली असून उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे परंतु शासन याकडे कोणतेही लक्ष देत नसल्याने येत्या



आठ दिवसात कमिशन न मिळाल्यास कामबंद करून संपाचा निर्णय घेणार असल्याचा इशारा त्यांनी तहसीलदार यांना निवेदन देऊन दिला आहे.

यावेळी सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्ष विजय मंडलिक, उपाध्यक्ष दयानंद शेळके, उपाध्यक्ष विठ्ठल अर्जुन, सुभाष शिकारे, सचिव राजेंद्र जाधव,कुलकर्णी काका, पाठक काका, नजीर मुलाणी, शिवाजी लोखंडे, लाला पाटोळे, किरण टकले, प्रकाश पवार, अफसर बागवान, विश्वास सिद, प्रकाश गायकवाड, मिलिंद रेडकर, राहुल निकम, श्रीराम जाधव, संजय खराडे, डी.डी.मदने, अण्णासो डोंगरे, बाळासो भुसारे, अक्षय मिले, रणजितसिंह भगत, सचिन ठोंबरे, नानासो काकडे, संजय कोपनर, उद्धव रणवरे, नितीन शेंडगे सह बहुतांश दुकानदार उपस्थित होते.

दुकानाचे भाडे लाईट बिल कामगार खर्च इत्यादी खर्चाने दुकानदार त्रस्त झाले आहेत.पाठीमागील काळात सणा मागे सण असल्याने दुकानदार संपावर गेले नाहीत.परंतु आता या खर्चामुळे व कमिशन न मिळाल्यामुळे दुकान चालवणे दुकानदारांना अशक्य झाले आहे. यासाठी तात्काळ या विषयावर वरिष्ठांनी निर्णय घ्यावा व न्याय द्यावा.

– विजय मंडलिक



## नातेपुते पोलीस ठाण्याच्यावतीने इफ्तार पार्टीचे आयोजन

**नातेपुते** : नातेपुते पोलिस ठाण्याच्या वतीने रमजानच्या पार्श्वभूमीवर नातेपुते येथील शाही मज्जिद मध्ये इफ्तार पार्टीचे बुधवार दिनांक १९ एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले. यावेळी नातेपुते पोलिस ठाण्याचे पोलीस अधिकारी प्रवीण संपांगे गोपनीय विभागाचे गणेश कापसे, पोलीस कर्मचारी जावीद जमादार, अमीन काझी, अक्रम बागवान, निजाम काझी, शब्बीर काझी, बशीर काझी यांच्यासह शहरातील विविध समाजाचे प्रतिष्ठित नागरिक, राजकीय पदाधिकारी, पत्रकार, व्यापारी बांधव उपस्थित होते. मागील दोन वर्षापासून कोरोना महामारीमुळे सर्व सार्वजनिक सण-उत्सव आणि कार्यक्रमावर प्रतिबंध होता. परंतू यावर्षी कोरोना नियंत्रणात आल्यानंतर सर्व नियम शिथिल झाल्यामुळे, नातेपुते पोलीस ठाण्याच्या वतीने मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे म्हणाले की, प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून सामाजिक सलोखा कायम ठेवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. सोशल मीडियाचा वापर करताना जातीय तेढ निर्माण होणार नाही याची काळजी प्रत्येकानेच घेतली पाहिजे. तसेच सामाजिक सलोखा बिघडू नये यासाठी प्रत्येकाने सहकार्य करण्याचे आवाहन केले.



## संगेवाडी सोसायटीच्या चेअरमनपदी राष्ट्रवादीचे सतीश खंडागळे

**सांगोला** : संगेवाडी (ता. सांगोला) येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमनपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे सतीश मच्छिंद्र खंडागळे यांची बिनविरोध निवड झाली. येथील सोसायटीचे तानाजी चिंतामणी पवार यांनी आपल्या चेअरमनपदाचा राजीनामा राजीनामा दिला होता त्यामुळे ही निवडणूक लागली होती. अध्यक्षपदासाठी सतीश खंडागळे यांनी एकमेव अर्ज दाखल केल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली. निवडीनंतर राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी गुलालची उधळण व फटाकांचे आतषबाजी केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष व मा.आम. दिपकआबा साळुंखे पाटील यांच्याहस्ते नूतन अध्यक्ष सतीश खंडागळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी दामोदर वाघमारे, सुभाष पाटील, खंडागळे, चंद्रशेखर वाघमारे, समाधान होवाळ, गणेश खंडागळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## अकलूजचा पंकज लोंढे झाला तालुका कृषी अधिकारी

**अकलूज** : महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग यांच्या वतीने घेण्यात आलेल्या कृषी सेवा पदांसाठीच्या परीक्षेसाठी अकलूजचा सुपुत्र पंकज सचिन लोंढे याची तालुका कृषी अधिकारी (वर्ग-२) या पदावर निवड झाली आहे. त्याने अनुसूचित जाती प्रवर्गामध्ये पाचवे स्थान प्राप्त केले आहे .सध्या कोरेगाव तालुक्यामध्ये मंडल अधिकारी म्हणून कार्यरत असलेले सचिन वसंत लोंढे यांचा पंकज लोंढे हा मुलगा असून त्याने राहुरी येथे नुकतेच एम. एरसी. (कृषी) पूर्ण केलेले आहे. पंकजचे प्राथमिक ते माध्यमिकपर्यंतचे शिक्षण सातारा येथील रयत हायस्कूलमध्ये झालेले असून बीएससी ऍग्री



अकलूज येथील रत्नाई कृषी महाविद्यालयामध्ये पूर्ण केलेले आहे. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी तो सध्या राहुरी येथे आहे .पहिल्याच प्रयत्नात त्याने घवघवीत यश प्राप्त केले असून पुढील काळामध्ये आणखी वेगवेगळ्या परीक्षेच्या माध्यमातून उच्च पदासाठी प्रयत्न करणार असल्याचे पंकजने सांगितले. पंकजच्या या यशामध्ये त्याने आपली आई- सौ.मनिषा,वडील सचिन लोंढे ,आजी सुभद्रा लोंढे चुलते प्रविण लोंढे सर, तुषार लोंढे व सर्व कुटुंबीय व मित्र परिवार आणि शिक्षकवर्ग यांचा वाटा असल्याचे नमूद केले. पंकजच्या या यशाबद्दल संपूर्ण तालुक्यातून त्याचे अभिनंदन केले जात आहे.

## पिलीव परिसरावर पुन्हा अवकाळी पावसाचे सावट



**पिलीव** : माळशिरस तालुक्यासह पिलीव परीसरात आज गुरुवारी पाच वाजल्यापासून जोरदार वारा व विजाचा कडकडाट सुरु झाला आहे. गेलया दोन दिवसापासून तापमानात प्रचंड वाढ झाली आहे तर उकाडा जाणवत होता आज मात्र सायंकाळी पाच वाजल्यापासून जोरदार वारा व विजांचा कडकडाट पाहवयास मिळत असुन अवकाळी पावसाचे सावट आहे. गेलया आठवडयात अवकाळी पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांनचे प्रचंड मोठे नुकसान झाले होते विशेषतः द्राक्ष, आंबा ,केळी,व इतर बागांचे नुकसान जास्त झाले आहे. तर मका,कडवळ व ऊसही जमीनदोस्त झाला होता. याची झळ कुसमोड परीसरातील शेतकऱ्यांना बसली होती. प्रशासनाने पंचनामे करण्याचे आदेश दिले होते तोपर्यंत पुन्हा एकदा अवकाळी पावसाचे सावट असुन अवकाळी पाऊस होणयाची शक्यता आहे.

सुराज्य सोलापूर
**Classified**
**विवाहविषयक**
वधु २६, ५.३, गोरी, १० वी, हिंदु लिंगायत, वडील नाहीत. आई-मुलीचा केटरींग व्यवसाय, शेती ४ एकर, मुलीकरीता सर्वजातीय सामान्य वर चालेल.
मो.7028536999
8446068427
(240423)

# अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या १८ जागांसाठी ३६ उमेदवार रिंगणात

## सत्ताधारी व विरोधक यांच्यात दुरंगी लढत

सुराज्य/अकलूज

**अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी १८ जागेसाठी ३६ उमेदवार रिंगणात उभे राहिले असून सत्ताधारी व विरोधक यांच्यामध्ये दुरंगी लढत होत आहे. निवडणुकीमध्ये सहकारी संस्था मतदार संघ सर्वसाधारण ७ जागेसाठी १४ उमेदवार आहेत.**

त्यामध्ये मोहिते पाटील मदनसिंह शंकरराव यशवंतनगर, रुपनवर मारुतीराव नाथा डोंबाळवाडी कुरबावी, चव्हाण शिवाजी चंद्रकांत चंद्रपुरी तांबेवाडी, सावंत नितीन अशोक कोळेगाव, कदम बाबुराव शंकरराव झंजेवस्ती, माने देशमुख बाळासो गुलाबराव शेरी वेळापूर, काकडे नागेश रघुनाथ तांदुळवाडी, जानकर उत्तमराव शिवदास वेळापूर, सावंत बाळासाहेब बंकट दसुर, इंगळे गणेश भजनदास इंगळेवस्ती संगम, पिसे पांडुरंग किसन गोरडवाडी, वाघमोडे पांडुरंग तुळशीराम ६१ फाटा माळशिरस, लाटे दादासाहेब अरुण पायरीपुल महाळुंग, पवार लक्ष्मण अगतराव इस्लामपूर.

सहकारी संस्था मतदार संघ महिला राखीव २ जागेसाठी ४ उमेदवार आहेत. त्यामध्ये साळुंखे मेघा सचिन तांबेवाडी, सुरवसे अमृता सुधीर खळवे, मोहिते पाटील पद्मजादेवी प्रतापसिंह धवलनगर यशवंतनगर, पाटील सोनाली राजेंद्र फोंडशिरस.

सहकारी संस्था मतदार संघ इतर मागासवर्गीय १ जागेसाठी २ उमेदवार आहेत. त्यामध्ये राऊत भानुदास यशवंत नातेपुते, फुले भीमराव सदाशिव दहिगाव.

सहकारी संस्था मतदार संघ विमुक्त जाती विमुक्त जमाती १ जागेसाठी २ उमेदवार आहेत. त्यामध्ये पाटील संदीप शामदत्त ६० फाटा माळशिरस, बोरकर अजित भरत विझोरी.

ग्रामपंचायत मतदार संघ सर्वसाधारण २ जागेसाठी ४ उमेदवार आहेत. त्यामध्ये पांढरे बापूराव नारायण नातेपुते, मोहिते पाटील पद्मजादेवी प्रतापसिंह धवलनगर यशवंतनगर, पाटील केशवराव कृष्णराव उर्फ के. के. पाटील निमगाव, देशमुख शहाजीराव मुधोजीराव नातेपुते.



ग्रामपंचायत मतदार संघ अनुसूचित जाती जमाती १ जागेसाठी २ उमेदवार आहेत. त्यामध्ये लोखंडे दत्तूराम हरिदास सुळेवाडी, जानकर उत्तमराव शिवदास वेळापूर, ग्रामपंचायत मतदार संघ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक १ जागेसाठी २ उमेदवार आहेत. त्यामध्ये भोसले पोपट रंगनाथ उंबरे वेळापूर, घाडगे यशवंतराव बाळासाहेब वेळापूर,

व्यापारी मतदार संघ २ जागेसाठी ४ उमेदवार आहेत. त्यामध्ये फडे आनंदा अशोक संग्रामनगर, गांधी महावीर मगनलाल नातेपुते, बागवान मोहसीन समशुद्दीन अकलूज, गरड दीपक महादेव अकलूज.

हमाल व तोलार मतदार संघात १ जागेसाठी २ उमेदवार आहेत. त्यामध्ये डांगरे उद्धव निवृत्ती आनंदनगर, कोळेकर संजय जीवराज अकलूज असे उमेदवार आहेत.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी चित्र स्पष्ट झाले असून सत्ताधारी मोहिते पाटील व विरोधी गटाची समोरासमोर लढत होणार आहे.सहाय्यक निबंधक तथा निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून एम. एल. शिंदे हे काम पाहत आहेत.

## जखमी झालेल्या तरुणाचा मृत्यू

**सोलापूर** : एमएम.१३. ईए.१०९७ या दोनचाकी दुचाकीवरून नियंत्रण सुटल्याने शेळगी कॉर्नर येथील शेतकरी फार्मच्या भिंतीला दुचाकी धडकली. ही घटना २३ मार्च रोजी शेळगी कॉर्नर येथे घडली. संशयित आरोपी आकाश सुभाष माळगे (वय-२६,रा. मनीष नगर, शेळगी) व फिर्यादी गणेश उर्फ पिंटू अशोक फाळके (वय-३७,रा.सद्गुरु नगर,शेळगी) यांचा पुतण्या किशोर सुनील फाळके (वय-१९,रा.शेळगी) हे दोघे फिर्यादी यांचा पुतण्या किशोर फाळके याच्या डोक्यात, तोंडास लागल्याने गंभीर जखमी झाला होता. त्याला सिव्हिल हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल केले असता,त्याचा उपचारादरम्यान दि.११ एप्रिल रोजी मृत्यू झाला. फिर्यादी यांच्या पुतण्याच्या मृत्यूस आकाश माळगे हा कारणीभूत झाला आहे.अशा आशयाची फिर्याद गणेश फाळके यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दिली आहे. घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव हे करीत आहेत.



## केंद्रातील सरकारकडून सुडबुद्धीने काम : डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील

सुराज्य/टेंभुर्णी

काँग्रेस पक्षाचे लोकप्रिय नेते राहुल गांधी यांच्यावर चुकीचे आरोप लावून त्यांची खासदारकी रद्द केल्याचा निषेधार्थ माढा तालुका काँग्रेस कमिटी यांच्यावतीने जय भारत सत्याग्रह सभेचे आयोजन केले होते. यावेळी डॉ धवलसिंह मोहिते पाटील यांनी बेरोजगारी, महागाई, भ्रष्टाचार आदी विषयावर केंद्र सरकारवर टीका केली.

भारत जोडो यात्रे मधे राहुल गांधी यांनी कन्याकुमारी ते काश्मीर या ३७०० ह्रा पाई पदयात्रे मध्ये अनेक लोकांशी संवाद साधला.लोकांचे प्रश्न अडचणी समजून घेतल्या. दरम्यानच्या काळात संसदेच्या अधिवेशनात आदानी उद्योग समूह ला २०००० कोटी रु ची मदत केली हा प्रश्न उपस्थित केला. उद्विंग्न झालेल्या मोदी सरकारने त्यांची जुन्या कोर्ट केस मधे अडकवून त्यांची खासदारकी रद्द केली.केंद्र सरकार त्यांचा विरोधात बोलणाऱ्या नेते मंडळींचा केंद्रीय तपास यंत्रणा चा दुरुपयोग करून आवाज दडपण्याचा प्रयत्न करत आहे. पुन्हा चांगले दिवस येण्यासाठी काँग्रेसच्या पाठीशी राहण्याचे आव्हान मोहिते पाटील यांनी केले. प्रास्ताविक काँग्रेसचे नूतन माढा तालुका अध्यक्षऋषिकेश बोबडे यांनी केले.यावेळी विजयकुमार हत्तुरे, दादासाहेब साठे, दिपक खोचरे यांची ही भाषणे झाली. स्वागत सूत्र संचलन आणि आभार काँग्रेस चे जिल्हा सरचिटणीस दिपक खोचरे यांनी केले.

यावेळी सोलापूर जिल्हा काँग्रेसचे वरीष्ठ उपाध्यक्ष विजयकुमार हत्तुरे, तालुक्याचे नेते दादासाहेब साठे, ज्येष्ठ नेते मोहनराव आपा बोबडे.डॉ सयाजी देशमुख, किशोर नाळे, टेंभुर्णीचे माजी उपसरपंच धनंजय गोधील, काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस दिपक खोचरे, अशोक चोपडे, राधाकृष्ण पाटील, जिल्हा संघटक हरीभाऊ मंगवडे, युवक काँग्रेसचे माजी विधानसभा अध्यक्षज्ञानेश्वर वाघ, चंद्रकांत कांबळे, अरविंद जगताप, तानाजी माने, जहीर मणेर, रफीक शेख, हमींद शिकलकर, पपू ताबे, इम्रान बागवान, हरून शेख, फिरोज ताबोळी, किरण देशमुख, सोमनाथ देशमुख, निखिल दळवी, पपु क्षीरसागर, आशिफ रास्तापुरे, नाना बारवे, श्याम गवळी, वामनराव नवले, विठ्ठल नवले, विठ्ठल साळुंखे आदी उपस्थित होते.

## ट्रॅक्टरच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर** : ट्रॅक्टरच्या धडकेत दुचाकी स्वार जखमी झाल्याची घटना दि.१८ एप्रिल रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास केगाव पोलीस प्रशिक्षण समोरील सिंहगड कॉलेज येथील सर्विस रस्त्यावर घडली.

यांप्रकरणी दयानंद माणिकराव पाटील (वय-४५, रा.मुपो. म्हाळंगी, ता. धाराशिव) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद




दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून ट्रॅक्टर क्रमांक एमएच.१३. सीएस. ५०६६ या क्रमांकाच्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी दयानंद पाटील व हरी जाधव हे त्यांची मोटारसायकल क्रमांक एमएच.२५. एटी.१७३४ यावरून जात असताना रस्त्याच्या डाव्या बाजूला समोरून येणारा डांबराच्या ट्रॅक्टर मधील चालकाने हयगयीने व अतिवेगाने ट्रॅक्टर चालवून फिर्यादी यांच्या मोटारसायकलीला धडक दिली. त्यावेळी फिर्यादी यांच्या छातीस, पायास, मांडीस दुखापत होऊन जखमी झाले. त्यांच्यासोबत असलेले हरी जाधव यांच्या देखील डोक्यास जबर दुखापत झाली आहे. या घटनेस ट्रॅक्टर चालक कारणीभूत असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक कसबे हे करीत आहेत.



## वेळापूर पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक राऊत, सूर्यवंशी यांचा सन्मान

**वेळापुर** : वेळापुर पोलीस स्टेशनच्या वतीने चांगले काम करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांनी बेस्ट पोलीस ऑफ मंथ ही नवीन प्रमाणपत्र देऊन गौरव केला जाणार आहे.

याची नुकतीच घोषणा करण्यात आली असून या महिन्याचे दोन पोलिस कर्मचारी वेळापूर पोलीस स्टेशनचे उप पोलीस निरीक्षक संजय राऊत व महिला पोलिस प्रिया सूर्यवंशी यांची नावे जाहीर करून त्यांचा वेळापूर पोलीस स्टेशनच्या वतीने सर्व पोलीस कर्मचारी यांच्या साक्षीने निलेश बागाव यांनी सन्मान केला. यावेळी बोलताना निलेश बागाव म्हणाले की पोलीस कर्मचारी आपापल्या बीटमध्ये २४ तास चांगले काम करतात अनेकांचे प्राण वाचवतात अपघातग्रस्तांना वेळेत दवाखान्यात पोचवतात अशा सर्वच पोलीस कर्मचाऱ्यांचा गौरव करणे गरजेचे असून जे पोलीस कर्मचारी चांगले काम करतील अशा सर्व पोलीस कर्मचाऱ्यांचा प्रत्येक महिन्याला सन्मान केला जाईल असे यावेळी निलेश बागाव यांनी सांगितले. यावेळी उपनिरीक्षक अल्ताफ काझी, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संजय रेगुडे, नितीन लिंगडे यांच्यासह सर्व पोलीस कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## दुचाकी स्लिप होऊन पडल्याने तरुण जखमी

**सोलापूर** : दुचाकीवरून जात असताना दुचाकी घसरून पडल्याने तरुण जखमी झाला आहे. साहिल मोरे (वय १८, रा. इंदापूर, पुणे) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. तो दुचाकीच्या पाठीमागे बसून जात असताना अपघात झाला. त्याला उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

## ट्रक चालकाला दुचाकीची धडक

सुराज्य/सोलापूर

रस्त्याच्या कडेला थांबून चहा पिणाऱ्या ट्रक चालकाला अज्ञात दुचाकीस्वाराने धडक दिल्याने ट्रकचालक जखमी झाला आहे.

सोपान अप्पाराव सानप ( वय ६७, रा. पनवेल, रायगड) असे जखमी झालेल्या चालकाचे नाव आहे. त्याला उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

## आ.राम सातपुते निवडणूक होईपर्यंत कर्नाटकात तळ ठोकून

**सोलापूर** : माळशिरस मतदारसंघातील भाजपा आमदार व युवा मोर्चा राष्ट्रीय उपाध्यक्ष रामभाऊ सातपुते यांच्याकडे कर्नाटक विधानसभा निवडणुकीच्या प्रचारार्थ मोठी जबाबदारी देण्यात आली आहे, कर्नाटकमधील विजापूर जिल्ह्यातील नागठाण या विधानसभेच्या प्रभारीपदी त्यांची नियुक्ती करत त्यांना पक्षाने मोठी जबाबदारी खांद्यावर टाकली आहे.



राष्ट्रीय स्तरावरून त्यांना ही जबाबदारी दिली आहे, तसेच नागठाण हा मतदारसंघ कर्नाटकमधील सर्वात मोठा मतदारसंघ असून त्या ठिकाणी आमदार राम सातपुते यांना पक्ष संघटनेने जबाबदारी दिली आहे. पक्षाने जबाबदारी दिल्यानंतर तातडीने कर्नाटक विधानसभेच्या रणधुमाळीत सोलापूर जिल्ह्यातील आमदार राम सातपुते यांनी सहभागी होत कामाला सुरुवात केली आहे, आमदार राम सातपुते हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू आमदार म्हणून ओळखले जातात, तसेच युवा आणि आक्रमक असलेल्या सातपुते यांची राज्यभरात मोठी क्रेझ तर आहेच मात्र भाजपा युवा मोर्चाच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष पदावर कार्यरत असल्याने देशभरातील युवा वर्गाशीही त्यांचा मोठा संपर्क आहे, त्याच कार्याच्या बळावर त्यांना पक्षाने ही संधी दिली आहे. कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीसाठी बुथ स्तरापासून ते प्रचार यंत्रणेपर्यंत प्रत्येक सूक्ष्म नियोजन करत प्रचाराची जबाबदारी खांद्यावर घेतली आहे, त्यांना प्रभारी केलेला नागठाण हा मतदारसंघ कर्नाटक मधील सर्वात मोठा मतदारसंघ आहे, त्यामुळे प्रवास, प्रचार दौरे आणि त्यासोबतच बूथ रचना पूर्ण करणे, पन्ना प्रमुख, आणि प्रत्येक गावापर्यंतच्या कार्यकर्त्यांनी या निवडणुकीत सक्रिय व्हावे आणि जास्तीत जास्त मतदान करण्यासाठी प्रयत्न करावे असे काटेकोर नियोजन आमदार राम सातपुते जातीने लक्ष देऊन करत आहेत. सातपुते यांना संघटनात्मक कामांचा अनुभव आणि मागील यशस्वीपणे काम केलेल्या प्रभारी पदाची शिदोरी यामुळे त्याच पद्धतीचे नियोजन करत नागठाण विधानसभेच्या विजयाची तयारी आमदार राम सातपुते करत आहेत.

### आ.रणजितसिंह मोहिते-पाटील व धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

# अकलूजमध्ये सोमवारी रोजगार मेळावा

सुराज्य/अकलूज

बेरोजगार युवक युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, भारतीय जनता पक्षाचे सोलापूर जिल्हा संघटन सरचिटणीस धैर्यशील मोहिते पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अकलूज येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

येथील ग्रीन फिंगर्स कॉलेज ऑफ कम्प्युटर अँड टेक्नॉलॉजी शंकर नगर विजयसिंह मोहिते पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग अँड रिसर्च इन्स्टिट्यूट शंकर नगर शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज यांच्या संयुक्त विद्यमाने शिवरत्न नॉलेज सिटी शंकरनगर येथे दि. २४ एप्रिल रोजी सकाळी नऊ वाजल्यापासून रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

ए एन जी सॉफ्टवेअर पुणे, क्लरटेक पुणे, इनपासेंट पुणे कोड एन जी टेक्नोमाईंड पुणे, बियाणी टेक्नॉलॉजी कोल्हापूर मध्ये , प्रो एरर सॉफ्टवेअर पुणे, एम जे ऑटोमेशन अँड सॉफ्टवेअर सोल्युशन मध्ये , कोडीट्रॉन टेक्नॉलॉजी पुणे , किरण अॅकॅडमी, टीमलीज सर्विसेस पुणे या कंपन्यांकडून डेव्हलपर पदासाठी भरती करण्यात येणार आहे. यासाठी यासाठी बीसीए, एमसीए, एमएससी कॉम्प्युटर, बी इ कॉम्प्युटर या पत्राताधारक अर्ज करू शकतात. बँकिंग क्षेत्रामध्ये आयसीआयसीआय बँक मध्ये रिलेशनशिप मॅनेजर यासाठी कोणत्याही शाखेचा पदवीधर उमेदवार अर्ज करू शकतो. भारतीय स्टेट बँकेत ऑफिसर्स पदासाठी भरती होणार आहे. ऑटोमोबाईल क्षेत्रामध्ये आय टी आय डिप्लोमा डिग्री मेकॅनिकल ऑटोमोबाईल पात्रता धारक उमेदवारांसाठी जागा उपलब्ध आहेत. आयकॉन सेस टेक विजन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीमध्ये बिझनेस शिवामृत उत्पादक सहकारी संघामध्ये ज्युनियर अकाउंटंट क्लार्क, सेल्स एक्झिक्युटव्ह,



टेक्निकल ऑफिसर, केमिस्ट, एम एस्सी केमिस्ट्री हे पात्रता धारक अर्ज करू शकणार आहेत, प्लांट सुपरवायझर वायरमन पदांसाठी जागा उपलब्ध आहेत. इक्वीटीज स्मॉल फायनान्स बँक, हिमाचल फुटूरीस्टीक कम्युनिकेशन लि.जस्टडायल लिमिटेड, मार्केटींग विभागात बियाणी टेक्नॉलॉजी कोल्हापूर येथे भरती होणार आहे. आश्विनी हॉस्पिटल अकलूज मध्ये स्टाफ नर्स, विजयसिंह मोहिते पाटील नर्सिंग कॉलेज मध्ये असोसिएट प्रोफेसर, असिस्टंट प्रोफेसर, ट्यूटर अँड क्लिनिकल इन्स्ट्रक्टर पदासाठी जागा उपलब्ध आहेत. प्रथम एज्युकेशन फाउंडेशन मध्ये नॉन टेक्निकल ट्रेनर मेंटर पदासाठी श्री आनंदी गणेश ट्रस्ट मध्ये क्लर्क अटेंडंट पदासाठी संधी उपलब्ध होणार आहे. या रोजगार मेळाव्यात खाजगी व सहकारी अशा एकूण २५ कंपन्यांमध्ये ५०० पेक्षा अधिक जगावर भरती करण्यात येणार आहे.

# राज्यात २५ कोविड रुग्णालये पुन्हा होणार सुरू

## मुंबई आणि नवी मुंबईत कोरोना वाढला

सुराज्य/मुंबई

**राज्यात कोरोनाने पुन्हा डोकं वर काढण्यास सुरूवात केली असून कोरोनाच्या आकडेवारीत दिवसेंदिवस वाढ होताना दिसतेय. मुंबई आणि नवी मुंबई शहरात कोरोनाची रुग्णसंख्या झपाट्याने वाढत आहे. यामुळेच कोरोनावर वेळीच नियंत्रण मिळवण्यासाठी राज्यात जवळपास २५ कोरोना रूग्णालये पुन्हा एकदा सुरू केले आहेत.**

मागील काही दिवसांपासून राज्याप्रमाणेच आता मुंबईपाठोपाठ नवी मुंबई शहरातही कोरोना रुग्णांचा आलेख वाढत आहे. नवी मुंबईत गेल्या २४ तासांत ५० रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह असल्याचं आढळून आलं आहे. त्यामुळं नवी मुंबईतल्या कोरोना रुग्णांची संख्या २२२वर पोहोचली आहे. गेल्या चोवीस तासात कोरोना रुग्णांची संख्या ५० झाल्यानं नवी मुंबई महापालिका प्रशासन सतर्क झालं आहे.

नवी मुंबई महापालिका प्रशासनाकडून दिवसाला दोन हजाराच्या आसपास कोरोना चाचण्या करण्यात आल्या आहेत. ऐरोली, वाशी आणि नेरूळ येथील महापालिका रुग्णालयांमध्ये कोरोना रुग्णांसाठी प्रत्येकी २० बेड्स राखीव ठेवण्यात आले आहेत. दरम्यान, मुंबईत गेल्या २४ तासांत २३४ नव्या कोरोनाबाधित रुग्णांची नोंद झाली. त्याच कालावधीत ३१९ रुग्ण हे कोरोनातून बरे झाले आहेत. त्यामुळं मुंबईतल्या कोरोनाबाधित रुग्णांचा आकडा




एक हजार ५९१वर पोहोचला आहे.

देशात चार दिवस काहीशी नियंत्रणात आलेली कोरोना रुग्ण संख्या पुन्हा एकदा वेगाने वाढत आहे. गेल्या २४ तासात देशात १० हजार ५४२ कोरोनाबाधित रुग्ण आढळले असून तब्बल ३८ जणांचा मृत्यू झालाय. नव्या रुग्णांमुळे सक्रीय रुग्णांची संख्या आता ६३ हजारांवर गेली आहे. वाढत्या रुग्ण संख्येच्या पार्श्वभूमीवर आता राज्यभरात कोरोना रूग्णालये पुन्हा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन यांनी ही माहिती दिली आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या अधिष्ठातांशी वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी आज संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते.

राज्यात गेल्या काही दिवसांपासून कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर महाजन यांनी आरोग्य सुविधांचा आढावा घेतला. यावेळी महाजन यांनी शासकीय रुग्णालय आणि महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा, ऑक्सिजनचा साठा, उपलब्ध असलेल्या व्हेंटिलेटर्सची संख्या, रेमीडिसीव्हीरची उपलब्धता, रुग्णांची संख्या कमी करण्यासाठी उपाययोजना, गरज पडल्यास अतिरिक्त डॉक्टर्सची उपलब्धता अशा विविध विषयांचा आढावा बैठकीत घेण्यात आला.

सद्यस्थितीत वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत रुग्णालयांमध्ये पाच हजारांहून अधिक खाटा उपलब्ध आहेत, दोन हजारांहून अधिक व्हेंटिलेटर आणि आवश्यकता पडल्यास ऑक्सिजनचे ६२ एलएमओ टँक्स, ३७ पीएसए प्लांट कार्यरत आहे.

या बैठकीला वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सचिव डॉ. अश्विनी जोशी, वैद्यकीय शिक्षण आयुक्त राजीव निवतकर, वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर, सहसंचालक डॉ. अजय चंदनवाले यांच्यासह अधिष्ठाता आणि संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. रुग्णालयात प्रत्यक्ष काम करणाऱ्या डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांना संरक्षणात्मक साधने उपलब्ध करून द्यावी, अशा सूचनाही महाजन यांनी दिल्या.

## अण्णा हजारे बनले उद्योजक

सुराज्य/अहमदनगर : आतापर्यंतच्या आयुष्यात अनेक आंदोलने करून जनहिताच्या कायद्याच्या निर्मितींसाठी पुढाकार घेतलेले ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे आता 'उद्योजक' बनले आहेत. त्यांना मिळालेल्या पुरस्कारांच्या रकमेतून हिंद स्वराज ट्रस्टच्या माध्यमातून हजारे यांनी लाकडी घाण्यावरील तेल आणि मसाले निर्मितीचा उद्योग राळेगणसिद्धी येथे सुरू केला आहे. अर्थात नफा कमावण्यासाठी नव्हे; तर गावकऱ्यांच्या आरोग्यासाठी त्यांना 'ना नफा ना तोटा' या तत्वावर येथील उत्पादने विकण्यात येत आहेत.


राळेगणसिद्धी गावात हिंद स्वराज्य ट्रस्ट या हजारे यांनीच स्थापन केलेल्या ट्रस्टच्या माध्यमातून हजारे यांनी हा नवीन प्रकल्प सुरू केला आहे. सध्या तो प्रायोगिक तत्वावर सुरू आहे. हळूहळू त्याचा विस्तार करण्यात येणार आहे. हजारे यांना मिळालेल्या विविध पुरस्कारांच्या रकमेतून सुमारे २४ लाख रुपये खर्च करून हा लाकडी घाण्यातून तेल निर्मितीचा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. सध्या यामध्ये सूर्यफूल, करडई, शेंगदाणे आणि नारळाचे तेल काढले जाते. भविष्यात आणखी ७० प्रकारच्या तेलबियांपासून तेल निर्मिती करण्याचा हजारे यांचा मनोदय आहे. याशिवाय मिरची पावडर, हळद पावडर, जिरे पावडर आणि विविध प्रकारचे मसालेही या प्रकल्पात तयार होणार आहेत. गुढी पाडव्याला याची मुहुर्तमेढ रोवण्यात आली. आता गावकऱ्यांसाठी हा प्रकल्प कार्यान्वित झाला आहे.

## लाचखोर अभियंता आणि वायरमनला २० वर्षांनी शिक्षा

सुराज्य/मुंबई

**सोलापूर महावितरण कार्यालयातील कनिष्ठ अभियंता बाबूराव म्हेत्रे, वायरमन इलाही शेखला लाच घेतल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने शिक्षा ठोठावली आहे. म्हेत्रेला एक वर्षाची तर शेखला सहा महिन्यांची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. या दोघांना २००३ मध्ये लाच घेताना अटक झाली होती. संशयाचा फायदा देत सोलापूर सत्र न्यायालयाने या दोघांची निर्दोष सुटका केली होती. सोलापूर सत्र न्यायालयाचा हा निकाल उच्च न्यायालयाने रद्द केला.**

यातील तक्रारदाराचे सोलापूर येथे दुकान आहे. सप्टेंबर २००३ मध्ये या दुकानाचे वीजचे बिल सुमारे सात हजार रुपये आले. तक्रारदाराने सोलापूर महावितरण विभागात कनिष्ठ अभियंता म्हेत्रे आणि वायरमन शेख यांची भेट घेतली. म्हेत्रे आणि शेख तक्रारदाराच्या दुकानात आले. चुकीची वायरींग झाली असल्याचे सांगून दुकानाची वीज कापण्यात आली. तक्रारदाराने वीज कनेक्शन पुन्हा सुरु करण्याची विनंती केली. यासाठी म्हेत्रे यांनी पाच हजार रुपये तर शेख यांनी तीन हजार रुपयांची मागणी तक्रारदाराकडे केली. तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (एसीबी) याची तक्रार केली. त्यानुसार एसीबीने म्हेत्रे आणि शेखला अटक करण्यासाठी सापळा रचला. एसीबीच्या पथकाने म्हेत्रेला तीन हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले. शेख यांच्यावतीने दुसऱ्या



### हायकोर्टाचा निकाल

व्यक्तिने तीन हजार रुपये तक्रादाराकडून घेतले. त्यालाही एसीबीच्या पथकाने अटक केली. या दोघांविरोधात सोलापूर विशेष सत्र न्यायालयात खटला चालला. सत्र न्यायालयाने १७ जानेवारी २००४ रोजी याचा निकाल देत या दोघांची निर्दोष सुटका केली. या निकालाविरोधात राज्य शासनाने मुंबई उच्च न्यायालयात याचिका केली.

न्या. एस. एम. मोडक यांच्या खंडपीठासमोर राज्य शासनच्या अपील याचिकेर सुनावणी झाली. न्यायालयने म्हेत्रे आणि शेखला निर्दोष सोडणारे सोलापूर सत्र न्यायालयाचे आदेश रद्द केले. न्यायालयाने म्हेत्रेला एक वर्षाची शिक्षा व दहा हजार रुपयांचा दंड ठोठावला. तसेच शेखला सहा महिन्यांची शिक्षा आणि पाच हजारांचा दंड न्यायालयाने सुनावला आहे. दंडाची रक्कम न भरल्यास या दोघांना अतिरिक्त शिक्षा भोगावी लागणार आहे.

## राष्ट्रवादीत धुसफूस कायम?

### पक्षाच्या शिबिर पत्रिकेतून अजितदादांचे नावच गायब

सुराज्य/मुंबई

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं आज, २१ एप्रिल २०२३ ला मुंबईत विभागीय कार्यकर्ता शिबीर घाटकोपरमध्ये आयोजित करण्यात आलं आहे. या कार्यक्रमाला स्वत: शरद पवार उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या प्रसिद्धीपत्रकात खासदार प्रफुल्ल पटेल, माजी मंत्री अनिल देशमुख यांच्यासह इतरही नेत्यांची नावं आहेत. परंतु या प्रसिद्धीपत्रकात अजित पवारांचे नाव मात्र वगळण्यात आले आहे.**

राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या उपस्थितीत पुन्हा एकदा कार्यक्रम होणार आहे. परंतु या कार्यक्रमाला राज्याचे विरोधी पक्ष नेते अजित पवार उपस्थित राहणार का? यावर आता चर्चा रंगल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं आज, २१ एप्रिल २०२३ ला मुंबईत विभागीय कार्यकर्ता शिबीर घाटकोपरमध्ये आयोजित करण्यात आलं आहे. या कार्यक्रमाला स्वत: शरद



पवार उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या प्रसिद्धी पत्रकात खासदार प्रफुल्ल पटेल, माजी मंत्री अनिल देशमुख यांच्यासह इतरही नेत्यांची नावं आहेत. परंतु या प्रसिद्धीपत्रकात अजित पवारांचे नाव मात्र वगळण्यात आले आहे. त्यामुळे शरद पवार यांच्या उपस्थितीत मुंबईत होत असलेल्या कार्यक्रमाला अजित पवार हजेरी लावणार की नाही, याची सध्या राजकीय वर्तुळात चर्चा आहे. अजित पवारांच्या कार्यालयातून समोर आलेल्या माहितीनुसार, अजित पवार यांचे पिंपरी-चिंचवडमध्ये आधीच काही नियोजित कार्यक्रम असल्याने ते या कार्यक्रमाला हजेरी लावू शकत नसल्याचं सांगण्यात आलं आहे.

## राहुल गांधींपुढे हायकोर्टाचा पर्याय

सुराज्य/सुरत

**मोदी आडनावाच्या बदनामीप्रकरणी काँग्रेस नेते राहुल गांधी यांना सुरत महानगर दंडाधिकारी न्यायालयाने ठोठावलेली २ वर्षांची शिक्षा आणि १५ हजारांचा दंड सत्र न्यायालयाने कायम ठेवला आहे. त्यामुळे राहुल गांधी यांची खासदारकी तूर्त तरी रद्दच राहणार आहे. सत्र न्यायालयाच्या निकालाला राहुल गांधी हे उच्च न्यायालयात आव्हान देणार असल्याचे सुत्रांनी सांगितले.**

महानगर दंडाधिकारी न्यायालयाने ठोठावलेल्या शिक्षेविरोधात राहुल गांधी यांनी सत्र न्यायालयात आव्हान दिले होते. याप्रकरणी न्यायालयाने मूळ तक्रारदार व भाजप नेते पूर्णेश मोदी यांना प्रत्युत्तर सादर करण्यासाठी नोटीस बजावली होती. त्यानंतर न्यायालयाने राहुल गांधी यांची शिक्षा रद्द करावी की नाही या मुद्द्यावर सविस्तर सुनावणी घेतली. सुनावणी पूर्ण झाल्यावर न्यायालयाने यावरील निकाल राखून ठेवला होता. गुरुवारी निकाल देताना न्यायालयाने राहुल गांधी यांची आव्हान याचिका फेटाळून लावली.

सर्व चोरांचे आडनाव मोदीच कसे, असे वक्तव्य राहुल गांधी यांनी २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात केले होते. याविरोधात पूर्णेश मोदी यांनी सुरत महानगर दंडाधिकारी न्यायालयात तक्रार दाखल केली होती. याप्रकरणी दोषी धरत गेल्या महिन्यात सूरत न्यायालयाने



राहुल गांधी यांना २ वर्षांची शिक्षा ठोठावली. त्यानंतर लगेचच न्यायालयाने राहुल गांधी यांना जामीन मंजूर केला. या शिक्षेविरोधात आव्हान याचिका दाखल करण्यासाठी न्यायालयाने राहुल गांधी यांना ३० दिवसांची मुदत दिली होती. दरम्यान, २ वर्षांची शिक्षा झाल्याने राहुल गांधी यांची खासदारकी लोकसभा सचिवालयाने रद्द केली. सत्र न्यायालयाने या शिक्षेला स्थगिती दिली तर राहुल गांधी यांच्या खासदारकीला संजीवनी मिळू शकते, अशी शक्यता वर्तवली जात होती.

सत्र न्यायालयाने राहुल गांधी यांची याचिका फेटाळून लावत दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवली. सत्र न्यायालयाच्या या निकालाला राहुल गांधी उच्च न्यायालयात आव्हान देऊ शकतात. उच्च न्यायालयाने राहुल गांधी यांच्या शिक्षेला स्थगिती दिली तर त्यांना खासदारकी पुन्हा मिळू शकते. आज शुक्रवारी राहुल गांधी उच्च न्यायालयात याचिका करणार असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे आता उच्च न्यायालयात तरी राहुल गांधी यांना दिलासा मिळणार की नाही हे बघावे लागेल.

## तहानलेल्या लांडोरवर कुत्र्यांचा हल्ला

बीड : जिल्हाभरात इकडे अवकाळी गारपिटीमुळे नागरीक आणि शेतकरी त्रस्त आहे. तर दुसरीकडे वन्यजीव पाण्याअभावी तडफताना पाहायला मिळत आहेत. उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून जंगलातील नैसर्गिक पाणवठे आटू लागले आहेत. वनविभागाच्या क्षेत्रातील मोर, लांडोर, आदी वन्य प्राणी पक्षी पाण्याच्या शोधात गाव तलावातील पाण्याकडे धाव घेत असून काही ठिकाणी या वन्यजीवांचा हल्ल्यात मृत्यू होताना दिसत आहे. अशीच एक पाण्याच्या शोधात असलेल्या लांडोर पक्ष्याचा कुत्र्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे.

## शिंदे-फडणवीस यांच्याकडून बाळासाहेबांच्या स्मारकाची पाहणी



सुराज्य/मुंबई : दादर येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाची पाहणी केली. त्यानंतर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, बाळासाहेबांच्या स्मारकाचं काम ५० टक्के झालंय. पक्षाची कोणतीही मागणी नाही. बाळासाहेबांचं स्मारक हे जनतेचं स्मारक आहे. जनतेतंच राहणार आहे. त्याच्या मॅनेजिंग कमिटीत कोण आहे. कोण नाही याच्याशी काही देणंघेणं नाही. हे स्मारक तयार करण्यासाठी मी मुख्यमंत्री असताना कायदा करून ही जागा हँडओव्हर केली होती.

एमएमआरडीएतनं त्यावेळी आम्ही मान्यता दिली. एमएमआरडीतनं काम होईल, हे सांगितलं. त्याला निधी उपलब्ध करून दिला. त्यानंतर त्या विभागाची जबाबदारी एकनाथ शिंदे यांच्याकडं आली. त्यांनी त्याला निधी उपलब्ध करून देऊन कामाला गती दिली. त्यानंतर एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री झाले. शिंदे हे मुख्यमंत्री असतानाचं या स्मारकाचं काम पूर्ण होणाराय. आम्हाला स्मारकाचं काम पूर्ण होऊन ते जनतेला समर्पित करण्यात रस आहे. त्या समितीत कोण आहे, त्यात आम्हाला काही रस नाही, असंही फडणवीस म्हणाले.

## राज ठाकरेंना मोठा धक्का; मनसे शहराध्यक्ष दातीरांचा राजीनामा

सुराज्य/नाशिक : महाराष्ट्र निर्माण सेनेचे नाशिकचे शहराध्यक्ष दिलीप दातीर यांनी आपल्या शहराध्यक्ष पदाचा राजीनामा दिला असून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना आपले पद मुक्त करावे अशा विनंतीचे पत्र पाठवले आहे. पक्षातील गटबाजीमुळे हा राजीनामा दिल्याची चर्चा सध्या नाशिकच्या राजकीय वर्तुळात सुरू आहे. परंतु हा राजीनामा दिलीप दातीर यांनी का दिला, या मागचे अध्यापही खरे कारण स्पष्ट होऊ शकलेले नाही. असे असले तरी दातीर यांनी आपल्या व्यक्तिगत कारणांमुळे राजीनामा दिला असून पक्ष सोडलेला नाही, अशी माहिती दिली आहे.तसेच पुढील आठवड्यात राज ठाकरे यांची भेट घेऊन आपली भूमिका मांडणार असल्याचं ते यावेळी म्हणाले आहेत.

## पंतप्रधान आवास घोटाळ्यात नवीन गुन्हा दाखल

सुराज्य/संभाजीनगर : महापालिकेच्या पंतप्रधान आवास योजना घोटाळ्यातील तीन कंपन्यापैकी जग्वार ग्लोबल सर्व्हिसेस कंपनीने बनावट कागदपत्रे तयार करून न्याती इंजिनीअर्स अँड कन्सल्टंट प्रा. लि. कंपनी भागीदार असल्याचे दाखविले. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशावरून जग्वार कंपनीच्या सुनील मिश्रीलाल नहार, आनंद फूलचंद नहार आणि गुंजाळ अँड असोसिएटसचे मनोज अरुण गुंजाळ या संचालकाच्या विरोधात सिटी चौक पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

## पोलिसांच्या छाप्यात सापडले घबाड

सुराज्य/धुळे : सुक्या चाऱ्याच्या गोण्यांखाली महिंद्रा पिकअप वाहनातून होत असलेल्या विदेशी दारू व बिअर तस्करीचा शिरपूर तालुका राज्य उत्पादन शुल्क विभागाने पर्दाफाश केला आहे. मध्यप्रदेशातून धुळ्याच्या दिशेने येणाऱ्या पिकअप वाहनातून महाराष्ट्रात प्रतिबंदीत असलेला लाखो रुपयांचा बिअर व विदेशी दारूचा साठा जप्त करण्यात आला आहे. दारू तस्करांच्या या अनोख्या शक्कलने सगळेच चकित झाले आहेत. शिरपूर तालुका राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक एस. एस. हांडे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून बोराडी मालकात्तर रस्त्याने एका चारचाकि वाहनामधून मध्यप्रदेशकडून धुळ्याकडे अवैधरित्या बिअर व दारू वाहतूक केली जात असल्याने बोरडी गावाजवळ आज सकाळच्या सुमारास सापळा लावण्यात आला होता.

## ऐन उकाड्यात पुण्यात पाऊस

### विजांच्या कडकडाटासह गारांची बरसात



सुराज्य/पुणे

राज्यात मागच्या काही दिवसांपासून पारा कमालीचा वाढला असून, अनेक शहरांमध्ये तापमानाने चाळीशी ओलांडली आहे. घराबाहेर पडल्यानंतर लोकांना उष्णतेच्या लाटेचा अनुभव येत असून काही मिनिटांतच शरीर घामांनी चिंब भिजत आहे. पण पुण्यात मात्र सध्या कुठे पाऊस तर कुठे गारा असं विचित्र वातावरण झालंय. त्यामुळे उकाड्यात घामाने भिजलेले पुणेकर अचानक आलेल्या पावसाने भिजून गेले आहेत.

दुपारच्या कडाक्याचा उष्णतेच्या लाटेने हैराण झालेले पुणेकर अचानक आलेल्या पावसाने काहींसे सुखावले आहेत. पुण्यात काही ठिकाणी पावसाच्या हलक्या सरी तर काही ठिकाणी वीजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाने हजेरी लावलीय. कोथरूड, वारजे, शिवाजीनगर आणि नवी पेठ परिसरात पावसाच्या सरी कोसळू लागल्या आहेत. सिंहगड परिसरात तर गारांचा पाऊस सुरू झालाय.

## लष्कराच्या ट्रकला भररस्त्यात भीषण आग, पाच जवानांचा मृत्यू

सुराज्य/जम्मू-काश्मीर

**जम्मू काश्मीरमधील पूंछ जिल्ह्यात लष्कराच्या वाहनाला भीषण आग लागली. या आगीमुळे पाच जवानांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. एका खासगी वृत्तसंस्थेने याबाबत वृत्त दिले आहे.**

पूंछमधील भिंबर गल्ली येथून तोटा गल्ली येथील लष्कराच्या ट्रकमधून रॉकेलची वाहतूक करण्यात येत होती. मात्र, चालत्या ट्रकला भररस्त्यात भीषण आग लागली. यामुळे पाच जवानांचा मृत्यू झाल्याचे समोर



आले आहे. वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडल्याने पूंछ येथे वीज कोसळली. यामुळे वाहनाला आग लागल्याची माहिती स्थानिकांनी दिली.

भारतीय लष्करातील पाच जवानांनी या आगीत आपले जीव गमावले आहेत, अशी प्रतिक्रिया जम्मूतील संरक्षण खात्यातील जनसंपर्क अधिकाऱ्यांनी दिली

## सत्तांतराच्या चर्चेदरम्यान राजनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

सुराज्य/मुंबई

**मागील काही दिवसांपासून महाराष्ट्रात राजकीय बदलाचे वारे वाहू लागले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार ४० आमदारांसह भारतीय जनता पार्टीला पाठिंबा देणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. पण अजित पवारांनी प्रसारमाध्यमांसमोर येत आपण राष्ट्रवादी काँग्रेसबरोबरच काम करणार आहे, असं स्पष्टीकरण दिलं आहे. महाराष्ट्रात सत्ताबदलाची चर्चा सुरू असताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली आहे.**



दोन्ही बड्या नेत्यांनी अशी अचानक भेट घेतल्याने महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं. या भेटीनंतर राज ठाकरे यांनी स्वत: प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. एकनाथ शिंदेंबरोबरच्या बैठकीत नेमकी चर्चा काय झाली? याचा खुलासा राज ठाकरे यांनी केला.

प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना राज ठाकरे म्हणाले, आज मुख्यमंत्र्यांची आणि माझी भेट झाली. मुंबईतील बरेच विषय प्रलंबित होते. त्यासंदर्भातील शिष्टमंडळं मी त्याठिकाणी बोलावली होती. यातील पहिला विषय असा होता की, वरळी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प. या चाळीत राहणाऱ्या लोकांनाच माहीत नाही की, तिथे काय होणार आहे? तेथील रहिवाशांना किती स्क्वेअर फुटांची घरं मिळणार आहेत. तो परिसर खूप मोठा आहे, तिथे नेमकं काय होणार आहे? तिथे शाळा, दवाखाने, मैदाने अशा सुविधा उभारल्या जाणार आहेत का? यातील कोणत्याही गोष्टींची त्यांना कल्पना नसल्याने संबंधित अधिकारी या बैठकीत हजर होते. ते लवकरच याबाबतचं सादरीकरण बीडीडी चाळीतील रहिवाशांसमोर करणार आहेत. यामुळे बीडीडी चाळींतील लोकांना एकप्रकारे स्पष्टता येईल.

सिडको संदर्भातील घरांच्या किमती २२ लाखांवरून ३५ लाखांवर नेल्या आहेत. या किमती पुन्हा २२ लाखांवर कशा आणता येतील? याबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाली. शिवाय पोलिसांच्या घरासंदर्भातही बैठकीत चर्चा झाली. सगळ्या प्रकरणात सकारात्मक प्रतिसाद मिळालाच पाहिजे, असं मी त्या अधिकाऱ्यांना सांगितलं आहे, अशी प्रतिक्रिया राज ठाकरेंनी दिली.

■ माढा बाजार समिती निवडणूक

# १७ जागांसाठी सत्ताधारी आ.शिंदे आणि शिवसेनेत सरळ लढत

## सत्ताधारी आघाडीचे रामभाऊ वाघमारे बिनविरोध

सुराज्य/माढा

**माढा तालुका कृषि उत्पन्न बाजार समितीच्या १८ जागांपैकी १७ जागांसाठी सत्ताधारी संजयमामा शिंदे आणि आमदार बबनराव शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी आणि शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा समन्वयक प्रा. शिवाजीराव सावंत यांच्या नेतृत्वाखालील परिवर्तन पॅनल यांच्यात सरळ लढत होणार आहे. ग्रामपंचायत मतदारसंघातील अनुसूचित जाती जमातीसाठीच्या जागेवर सत्ताधारी पॅनलचे रामभाऊ वाघमारे हे बिनविरोध निवडून आले आहेत.**





कुर्डुवाडी कृषि उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या निवडणूकिसाठी एकंदर १४६ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते छाननीत १४ अर्ज अवैध ठरल्याने एकंदर १३२ अर्ज शिल्लक राहिले होते. गुरूवारी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी सर्वप्रथम महाविकास आघाडीचा घटक असलेल्या काँग्रेसने दाखल केलेले सर्व उमेदवारी अर्ज काढून घेतले .याचबरोबरशेतकरी कामगार पक्षाचे ड बाळासाहेब पाटील यांनी भरलेले सर्व उमेदवारी अर्ज परत घेतले. शिवसेना शिंदे गटाच्या नेतृत्वाखालील परिवर्तन पॅनलने सतरा जागांवर आपले उमेदवार उभे केले. यामध्ये माढा लोकसभा मतदारसंघाचे संपर्कप्रमुख संजय कोकाटे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या शारदा शिवाजी पाटील, शिवाजी सुर्वे, विनायक केचे, प्रवीण पाटील, भारत गायकवाड, राहुल चव्हाण, विनोद पाटील, कमल गिड्डे, नवनाथ वाघे, परिक्षीत पाटील, ज्ञानदेव सलगर आदींचा समावेश आहे. तर सत्ताधारी आघाडीचे नेते आमदार संजयमामा शिंदे, सुहास पाटील, हणुमंत पाडूळे, दिलीप भोसले, रमेश पाटील, सुरेश बागल, उत्कर्ष देशमुख,किसन पाटील, शिवाजी पाटील, अमोल देवकर, निकिता खटके, सुमन मोरे, विजयकुमार लोंढे, नागनाथ पाटील, दोभाडा, सतीश सुर्वे आदी प्रमुख उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. जाती जमाती साठीच्या एका जागेसाठी सत्ताधारी आघाडीचे रामभाऊ वाघमारे यांचा एकमेव अर्ज राहिल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली असून औपचारिक घोषणा होणे बाकी आहे.

### आमचा विजय निश्चितः आ. बबनदादा

आ. संजयमामा शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही सर्वच्या सर्व जागा मोठ्या मताधिक्याने जिंकू. एकत्र बसून महाविकास आघाडी म्हणून ही निवडणूक लढवित आहोत.आजपर्यंत केलेल्या कामाची जनता पोचपावती देत असते त्यानुसार विजय निश्चित आहे. शुक्रवारी सकाळी रांझणीच्या ओंकारेश्वर मंदिरात प्रचाराचा शुभारंभ करण्यात येत असल्याचे आ. बबनदादा शिंदे यांनी सांगितले.

### परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे : कोकाटे

सत्ताधाऱ्यांनी अनेक नियमबाह्य कामे केली आहेत.यामुळे सर्वसामान्य जनता जनार्दनाचे पाठबळ आमच्या सोबत असून सर्वच्या सर्व जागा आम्ही जिंकू असा विश्वास शिवसेनेचे नेते कोकाटे यांनी व्यक्त केला.



# पंढरपूर बाजार समितीसाठी भालके-काळेंची माघार

## परिचारकांसमोर अभिजित पाटील यांचे आव्हान

**पंढरपूर** : पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या एकूण १८ जागांपैकी पाच जागा बिनविरोध झाल्या असून उर्वरित १३ जागेसाठी २९ उमेदवार निवडणूक रिंगणात उभे आहेत. भालके, काळे, आवताडे गटाने सर्व उमेदवारी अर्ज मागे घेतल्यामुळे परिचारक यांच्यासमोर अभिजित पाटील यांचे आव्हान असेल. भालके, काळे व आवताडे गटाच्या उमेदवारांनी सर्व अर्ज मागे घेतले.

बाजार समितीसाठी विक्रमी ११७ अर्ज दाखल झाले होते. अर्ज माघारी घेण्याच्या दिवशी ८८ जणांनी उमेदवारी मागे घेतली. दरम्यान परिचारक गटाचे पाच सदस्य बिनविरोध झाले आहेत. यामध्ये नागनाथ मोहिते, वसंत चंदनशिवे, शिवदास ताड, यासीन बागवान व सोमनाथ डोंबे यांचा समावेश आहे. उमेदवार पुढील प्रमाणे- परिचारक गट- सहकारी संस्था मतदार संघ- हरीश गायकवाड, दिलीप चव्हाण, तानाजी पवार, संतोष भिंगारे, राजू गावडे, महादेव बागल, हरिभाऊ फुगारे. महिला राखीव- संजीवनी बंडू पवार, शारदा नागटिळक. विमुक्त जाती- महादेव सुखदेव लवटे . ग्रा.पं. सर्वसाधारण- पंडित शेंबडे, अभिजीत कवडे

अभिजीत पाटील गटः सहकारी संस्था - सुरेश सावंत, मधुकर मोलाने, सुभाष भोसले, राजाराम भोईरकर, रामदास रोंगे, नारायण कोरके, बाजीराव गायकवाड. महिला राखीव- संगीता हळनवर, अनिता बागल. विमुक्त जाती- अभिमान जाधव ग्रा.पं. सर्वसाधारण- विवेक मांडवे, आसबे. यासह रुक्मिणी रणदिवे, मनसेचे बागल, शशिकांत पाटील व नवनाथ रणदिवे हे उमेदवार देखील रिंगणात आहेत.

## मुलाने आई-बहीणीसह भाऊजीवर केला चाकू हल्ला

**सोलापूर** : कौटुंबिक कारणातून मुलाने आई, बहीण व भाऊजीवर चाकूने हल्ला करत जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी महेश सिद्राम ताळीकोटी (रा.शेडम,गुलबर्गा) याच्यावर सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना बुधवारी सायंकाळी महापौर बंगला जवळील ऑर्किड अपार्टमेंटच्या पार्किंग भागात घडली. या हल्ल्यात मनोज श्रींमंत कामनुरकर,प्रिया मनोज कामनुरक,कविता सिद्राम ताळीकोटी हे तिघे जखमी झाले आहेत.याप्रकरणी मनोज कामनुरकर (वय-४०,रा. बुधवार पेठ,अक्कलकोट) यांनी फिर्याद दिली आहे. दरम्यान, याप्रकरणातील आरोपीचा शोध पोलिस करत आहेत. कौटुंबिक कारणातून महेश ताळीकोटी याचा आई व बहिणीशी वाद झाला. त्यावेळी रागाच्या भरात त्याने त्याची आई कविता ताळीकोटी यांना चापटा मारून डोक्यात वीट घातली. चाकूने त्यांच्या पाठीत खुपसले.त्यानंतर मनोज यांवी पत्नी प्रिया यांच्या पोटात खुपसुन उजव्या भुवईवर वार केले. अशा आशयाची फिर्यादी मनोज कामनुरकर यांनी दिली आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक धायतोंडे हे करीत आहेत.

## कस्तुरबा मार्केटमधून दुचाकी पळवली

**सोलापूर** : हॅण्डल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.सीडी.४०९१ हे अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. ही घटना १८ एप्रिल रोजी रात्री सात ते आठ वाजण्याच्या दरम्यान घडली.याप्रकरणी शुभम शशिकांत मधुरे (वय-२७,रा.गुलमोहर वसंत विहार बाळे) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखविले केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरटेविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक शिवशरण हे करीत आहेत.

## कौटुंबिक कारणातून इसमाला सत्तुरने मारहाण

**सोलापूर** : कौटुंबिक कारणातून इसमाला सत्तुरने व कुर्हाडीने मारहाण केल्यामुळे इसम जखमी झाला आहे. बालाजी शंकर भोसले (वय-४०,रा.मुळेगाव) असे रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. त्यांना छत्रपती शिवाजी महाराज शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

## शेतकऱ्यावर कोयत्याने केले वार

**सोलापूर** : शेतीच्या कारणातून तिघांनी मिळून शेतकऱ्यावर कोयत्याने वार केल्याने शेतकरी जखमी झाला आहे.लहू बाबुराव दिसले (वय-४८,रा.ज्योतीबाची वाडी, बार्शी) असे रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या शेतकर्याचे नाव आहे.त्यांना छत्रपती शिवाजी महाराज शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

## दुचाकीच्या धडकेत दोघे जखमी

**सोलापूर** : दुचाकीवरून अशोक चौक ते पोलिस मुख्यालयकडे जाताना अज्ञात दुचाकीने धडक दिल्याने दोघे जखमी झाले आहेत. विरेश अशोक रूजे (वय-२५,रा.अशोक चौक), श्रीधर श्रीकांत गायकवाड (वय-२४,रा.अशोक चौक) हे दोघे जखमी झाले आहेत.त्यांना उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

## वाढत्या उन्हामुळे ईदची नमाज अर्धातास अगोदर

**सोलापूर** : वाढत्या उन्हामुळे मुस्लिम बांधवांना त्रास होऊ नये यासाठी शहरातील शाही आलमगीर ईदगाह पानगल स्कूल, सोलापूर व आलमगीर ईदगाह होटगी रोड, सोलापूर या दोन ईदगाह मैदानावरील नमाजाच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. या मैदानावर सकाळी ९ ऐवजी ८.३० वाजता रमजान ईदची नमाज होणार असल्याची माहिती शहर काझी मुफ्ती काझी सय्यद अहजदअली यांनी कळविले आहे.

सध्या शहरातील तापमानात वाढ झाली आहे. तापमानाचा पारा ४२ अंशाच्या पुढे गेला आहे. मार्च महिन्यात ३७ अंशावर असलेले तापमान एप्रिलच्या पहिल्या आठवड्यानंतर ४० अंशाच्या पुढे गेले होते. त्यानंतर हळूहळू तापमानात वाढ होतच आहे. एप्रिल १५ नंतर उन्हाळा मोठ्या प्रमाणात वाढला. उकाड्याने सोलापूरकर हैराण अन् घामेघूम होत आहे. सोलापुरात सकाळी ७ वाजल्यापासूनच उन्हाचे चटके बसायला सुरूवात होत आहे. अशातच मुस्लिम बांधवांच्या आरोग्याच्या दृष्टीने शहर काझी यांनी शहरातील दोन मैदानावरील रमजान ईदच्या नमाज च्या वेळेत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. ९ वाजता होणारी नमाज आता साडेआठ वाजता होणार असल्याचे कळविले आहे.

# सांगोला बाजार समिती निवडणुकीच्या १८ जागांसाठी ४६ उमेदवार रिंगणात

## दोन जागांच्या निवडणुका बिनविरोध; अंतिम उमेदवारांची यादी प्रसिध्द होणार

सुराज्य/सांगोला



सांगोला कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत गुरूवारी अर्ज माघार घेण्याच्या अखेरच्या दिवशी ८० उमेदवारांनी अर्ज माघार घेऊनही दोन बिनविरोध उमेदवारासह १८ जागेसाठी ४६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. दोन जागा बिनविरोध झाल्या असून अंतिम उमेदवाराची यादी शुक्रवार २१ एप्रिल रोजी प्रसिद्ध होणार आहे

गुरूवारी अखेरच्या दिवशी शेकाप व आनंद माने गट, राष्ट्रवादी, शिवसेना शिंदे गट, भाजपा, काँग्रेस असे एकत्र येऊन १८ जागेपैकी बारा जागा शेकाप व आनंद माने गट यांना तर उर्वरित सहा जागा राष्ट्रवादी, शिवसेना, शिंदे गट, काँग्रेस, भाजपा असे जागेचे वाटप झाले. अर्जाची संख्या जास्त असल्याने ज्यांनी अर्ज दाखल केलेले उमेदवार होते. त्यांच्यापर्यंत सर्वच नेत्यांना पोहोचता आले नाही तसेच त्यांची समजूत काढता आली नाही.

काही उमेदवार अर्ज काढण्यासाठी गेले असता कार्यालयासमोरच गोंधळ झाल्याने कार्यालयात जाता आले नाही व तीन वाजून पाच मिनिटांनी शटर बंद केल्याने आत जाता आले नाही. त्यामुळे काही उमेदवारांचे अर्ज राहिले आहे. तालुक्यातील सर्व बलाढ्य पक्ष एकत्र येऊन ही निवडणूक बिनविरोध झाली नाही. हमाल मापारी या गटात तीन अर्ज दाखल झाले होते तेथे दोघांनी अर्ज माघार घेतल्याने शेकापचे दगडू गावडे यांचा एकच अर्ज राहिला आहे तसेच आर्थिक दुर्बल घटक या गटातील तीन अर्ज दाखल झाले होते.

त्यामध्ये दोघांनी अर्ज माघार घेतल्याने राष्ट्रवादीचे चंद्रकांत करांडे यांचा एकच अर्ज राहिला आहे. रिपाइं आठवले गट, भाजप, बंडखोर गट शेकाप, ॲड. सचिन देशमुख यांचा गट तसेच उद्धव ठाकरे शिवसेना पक्ष व काही अपक्ष तसेच ज्या पक्षाची युती झाली आहे. त्यांचे सोळा अर्ज असे मिळून ४४ उमेदवार रिंगणात आहेत अंतिम उमेदवाराची यादी शुक्रवार २१ एप्रिल रोजी प्रसिद्ध होणार असून त्याच दिवशी चिन्हाचे वाटप केले जाणार आहे.

## शेळगी परिसरात तोतया पोलिसांचा धुमाकूळ

सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहर व परिसरात सध्या तोतया पोलिसांचा धुमाकूळ सुरू आहे. भर दुपारी घरोघरी जाऊन महिला व वयोवृध्दांच्या फसवणुकीचे प्रकार वाढले आहेत. अलीकडे तर शेळगीत या तोतया पोलिसांनी उच्छांद मांडला आहे. महिन्यांपूर्वीच शेळगीतील लक्ष्मी सोसायटीतील एका महिलेची अशीच फसवणूक झाली आहे.

शिवगंगा नगरमध्येसुध्दा असाच काहीसा प्रकार उघडकीस आला. तोतया पोलिसांनी एका घरी जाऊन तुमच्या पतीविरूध्द विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे,असे सांगून एका महिलेला गंडविण्याचा प्रयत्न केला. अंगात पोलिसांचा गणवेश, पायात लाल शूज अशा अवतारात हे तोतया पोलीस फिरत असल्याने त्यांना ओळखणे अवघड बनले आहे. याचाच गैरफायदा ही टोळी घेत आहे.

## ट्रॉली चालकाने धडक दिल्याने सायकलस्वार जखमी

**सोलापूर** : सत्तर फुट रोड परिसरातून जात असताना अज्ञात ट्रॉली चालकाने धडक दिल्याने सायकलस्वार जखमी झाला आहे. यादगिरी विठ्ठल वंगारी (वय-४७,रा.परळेकर विडी घरकुल) असे जखमी झालेल्यांचे नाव आहे. त्यांना उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

### वाहनाच्या धडकेत महिला जखमी

**सोलापूर** : मालवाहतूक वाहनाने दुचाकीवरील महिलेला धडक दिल्याने महिला जखमी झाला आहे. सिमा विष्णू नाईकनवरे (वय-३२,रा.फुल चिंचोली,पंढरपूर) या जखमी झाल्या आहेत.त्यांना उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

## जुन्या पेन्शनचा निर्णय घ्या, खासगीकरण, कंत्राटीकरण थांबवा

### सरकारी कर्मचाऱ्यांची जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने

सुराज्य/सोलापूर



राजस्थान, छत्तीसगढ, झारखंड, पंजाब, हिमाचल प्रदेश येथील राज्य सरकारने तेथील कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू केली आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही जुनी पेन्शन लागू करण्याचा निर्णय घ्यावा. तसेच खाजगीकरण, कंत्राटीकरण बंद करून तातडीने कर्मचारी भरती प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी करीत राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली. महाराष्ट्रातील १८ लाख पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांनी जुनी पेन्शन व अन्य महत्त्वाच्या मागण्यांसाठी १४ ते २० मार्च दरम्यान संप पुकारला होता. त्यावेळी शासनाने पेन्शनसंबंधी आर्थिक व सामाजिक सुरक्षेची हमी हे धोरण तत्वतः मान्य करीत जुनी पेन्शन योजना लागू करण्यासंदर्भात समिती गठीत केली. ही तीन महिन्यांत अहवाल सादर करणार आहे. हा अहवाल तयार करताना राजस्थान, छत्तीसगढ, झारखंड, पंजाब, हिमाचल प्रदेशचा निर्णय विचारात घ्यावा व तातडीने निर्णय घ्यावा अशी मागणी करणारे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांना देण्यात आले.

निदर्शने आंदोलनात राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष विरुपाक्ष घेरडे, सरचिटणीस अमृत कोकाटे, शासकीय निमशासकीय कर्मचारी संघटना समन्वय समितीचे निमंत्रक अशोक इंदापुरे, महसूल कर्मचारी संघटनेचे नेते शंतनू गायकवाड, विवेक लिंगराज, अविनाश गोडसे, तात्यासाहेब जाधव, प्रशांत लंबे, दयानंद चव्हाण, आशिष चव्हाण, किशोर सावळे, मऱ्याप्पा फंदीलोलू, अमर भिंगे, नरेंद्र बोनाकृती, राजीव साळुंखे, ज्योतीराम शिंदे, रवि नष्टे, अमर भिंगे, लक्ष्मीकांत आयगोळे, रणजित म्हेत्रे, उमेश सरवळे, सुखदेव वाघमारे, श्रीकांत राठोड, सागर वाघमोडे, शंकर जाधव, अरुण चौगुले, विनोद वारे, अमर रिझ्झोरा, नितीन कसबे, राम शिंदे, आनंद सोनकांबळे, देवीदास शिंदे, पंकज जाधव, राजू कव्यावाले, खंडू भोसले, सायमन गड्डू आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## मिरवणूक मार्गावर महापालिकेतर्फे रुग्णवाहिकेची सोय

**सोलापूर** : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंती निमित्त रविवार दिनांक २३ एप्रिल रोजी काढण्यात येणाऱ्या मिरवणूक मार्गावर महापालिकेच्या वतीने चार ठिकाणी रुग्णवाहिकेची सोय करण्यात आल्याची माहिती महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. बसवराज लोहारे यांनी दिली.



सालाबादप्रमाणे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंती निमित्त रविवारी दि. २३ एप्रिल रोजी दुपारी १ वा.पासून सुरुवात होणार आहे. या मिरवणुकीमध्ये मोठ्या प्रमाणावर उत्सव मंडळे सामील होणार आहेत. मिरवणुकीमध्ये आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास उपाययोजना म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक परिसर, महापौर निवासस्थान, रेल्वे लाईन्स, डॉ.कोटणीस स्मारक, नवीवेस पोलीस चौक या परिसरात सुसज्ज अशी रुग्णवाहिका आवश्यक त्या वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी यांच्यासह तैनात ठेवण्यात येणार आहे. आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली तर नागरीकांनी रुग्णवाहिकेचे सहकार्य घ्यावे, असे आवाहन आरोग्यधिकारी डॉ.लोहारे यांनी केले आहे.

# जयंती मिरवणूक मार्गावरील अतिक्रमणधारकांवर कारवाई

## नवी पेठेत पळापळ झाली अन् काही मिनिटातच रस्ता रिकामा

सुराज्य/सोलापूर

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती मिरवणूक मार्गावरील अतिक्रमण काढण्याची मोहीम महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने हाती घेतली. गुरुवारी सकाळी नवी पेठ परिसरात दुकानासमोर रस्त्यावर ठेवण्यात आलेले फलक व इतर साहित्य जप्तीची कारवाई केली. पथक येत असल्याचे पाहताच नवी पेठेतील फेरीवाले आपापल्या चार चाकी गाड्या घेऊन पसार झाले. पळापळ झाली अन काही मिनिटातच हा रस्ता रिकामा झाला.**



रविवार दि. २३ एप्रिल रोजी भीम जयंतीनिमित्त शहरात मिरवणूक काढण्यात येणार आहे. महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली या मिरवणूक मार्गावरील रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने हाती घेतली आहे. गुरुवारी सकाळपासूनच नवी वेस पोलीस चौकी ते राजवाडे चौक या मार्गावर कारवाई करण्यात आली.

सोलापूर महापालिका अतिक्रमण विभागाचे पथक पोलीस बंदोबस्तासह रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण हटविण्यासाठी नवी पेठच्या कोपऱ्यावर सकाळी ११.१५ वाजता दाखल झाले. मेकॅनिक चौकाकडून नवीपेठेच्या दिशेने येणाऱ्या या पथकास दुरूनच पाहून नवी पेठेतील सर्व फेरीवाल्यांची एकच धावपळ सुरू झाली. आपापल्या चार चाकी गाड्या, स्टॅन्ड, टेबल व इतर साहित्य घेऊन त्यांनी पळापळ सुरू केल्याचे दिसून आले. बघता बघता काही मिनिटातच आपापल्या गाड्या घेऊन हे फेरीवाले पसार झाल्याने हा रस्ता रिकामा झाला. या पथकात महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधिकारी ,कर्मचारी सहभागी झाले होते. रस्त्यावर अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची कारवाई नियमित करण्यात येणार आहे, तेव्हा कोणीही रस्त्यावर अतिक्रमण करू नये, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

### केवळ छोटे साहित्यच जप्त

नवी पेठेतील रहदारीस अडथळा ठरणारे, काही दुकानासमोर रस्त्यावर लावण्यात आलेले फलक, अँगल, पंखे, टेबल आदी साहित्य पथकाने जप्त केले. केवळ छोटे साहित्य जप्तीवरच या पथकाला समाधान मानावे लागले. साधारणतः पाऊण तास हे पथक या ठिकाणी तैनात होतं. या कारवाईत दुकानासमोर ठेवलेले २ फ्रिज, पंखे, डिजिटल बोर्ड, टेबल, खुर्ची, स्टँड असे साहित्य जप्त करण्यात आले.

## भाजपच्या महिला पदाधिकारीही कर्नाटक निवडणुकीच्या प्रचारात उतरल्या

सुराज्य/सोलापूर



सध्या कर्नाटकात विधानसभा निवडणूक सुरू आहेत. या निवडणुकीसाठी भाजपकडून शहर आणि जिल्ह्यातील आमदार प्रचाराला जाऊन आले आहेत. आता शहरातील भाजपाच्या महिला पदाधिकारी ही विधानसभेच्या प्रचाराला गेल्या आहेत. पहिल्या टप्प्यात बेळगाव आणि धारवाड या मतदारसंघात महिलांचा प्रचार सुरू आहे तर दुसऱ्या टप्प्यात आणखी काही महिला पदाधिकारी भाजपच्या प्रचाराला जाणार आहेत.

कर्नाटकात विधानसभा निवडणुकींचे राजकारणही तापले आहे. निवडणूक जिंकण्यासाठी भाजप राज्यात लोकसभा निवडणुकीसारखी ताकद लावणार आहे. निवडणूक अभियानात केंद्रीय नेत्यांशिवाय १७ हजारांहून अधिक कार्यकर्त्यांची फौज उतरवली आहे.

राज्यात विधानसभेच्या २२४ जागा आहेत. प्रत्येक मतदारसंघात पक्षाचे सुमारे ७५ कार्यकर्ते निवडणूक प्रचार संपेपर्यंत हजर राहतील. सोलापुरातून भाजप आमदार विजयकुमार देशमुख, सुभाष देशमुख, राम सातपुते हे कर्नाटकात प्रचारासाठी गेले होते त्यांचा प्रचार आता संपला आहे. आता महिलांचा प्रचार सुरू झाला आहे. भाजपच्या महिला पदाधिकारी सध्या बेळगाव आणि धारवाड येथे भाजप उमेदवाराचा प्रचार करत आहेत. यामध्ये माजी शोभाताई बनशेट्टी, अर्चना वडनाल, जया माने आणि भाजपच्या महिला सरचिटणीस गीता पाटोळे यांचा समावेश आहे. ग्रामीणमधून पाटोळे या एकमेव महिला भाजपच्या प्रचारसासाठी गेल्या आहेत. आगामी काळात शहर महिला उपाध्यक्षा संगिता जाधव यांच्यासह आणखी काही महिला प्रचारासाठी कर्नाटकात जाणार आहेत.